७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०३० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## वाळव्यात करणी अन् काळी जादू

सांगली (दै. संध्या) : महापालिका निवडणुकीनंतर आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा धुरळा उडाला असून त्यामध्ये सर्व प्रकारचे मार्ग अवलंबले जात असल्याचं दिसतंय. यामध्ये करणी आणि काळी जादूचा मार्गही अवलंबला जात आहे. परंतु सांगलीमध्ये काही वेगळाच प्रकार घडल्याचं समोर आलं. जिवंत नव्हे तर चक्क मयत व्यक्तीच्या फोटोवर करणी केल्याचं दिसून आलं. वाळवा तालुक्यातील येल्लूर येथे स्व. राजाराम बापू पाटील यांच्या प्रतिमेला टाचण्या टोचल्याचे, लिंबू फिरवल्याचे आढळून आले आहे. यामुळे पुरोगामी ओळख असणाऱ्या जिल्ह्याला डाग लागला असल्याची चर्चा सुरू झाली आहे. स्व. राजाराम बापू पाटील हे माजी मंत्री जयंत पाटील यांचे वडील आहेत. नुकत्याच महानगरपालिका निवडणुका पार पडल्या असून आता राज्यातील प्रमुख जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद निवडणुका पार पडत आहेत. या निवडणुकीच्या निमित्ताने सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही बाजूने जोरदार प्रचार सुरू आहे. प्रचारादरम्यान आरोप प्रत्यारोप, टीका टिप्पणी होत असते, मात्र पुरोगामी विचारांचा वारसा जपणाऱ्या आणि पुरोगामी चळवळीला ताकद देणाऱ्या सांगली जिल्ह्यात करणीची ही विपरीत घटना घडली.

### ढिंग-टांग




# दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका!

■ ३० लाख कोटींचे सामंजस्य करार, १८ देशांमधून गुंतवणूक; देवेंद्र फडणवीसांनी दिली माहिती ■

**मुंबई (दै. संध्या)**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या दावोसच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी इथून महाराष्ट्रात किती गुंतवणूक आली आहे तसेच राज्याच्या कोणत्या भागात व कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक आली आहे, यांची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, दावोस दौरा हा अतिशय यशस्वी झाला आहे. मला सांगताना आनंद वाटतो की जवळपास गुंतवणुकीचे करार जे केले आहेत ते 30 लाख कोटी रुपयांचे आहेत. अजून 7-10 लाख कोटी पुढच्या काळात होणार आहे. ही जी काही गुंतवणूक आहे, यात इंडस्ट्री सेक्टर आहे, सर्व्हिस सेक्टर आहे, कृषी क्षेत्र आहे, सगळ्याच क्षेत्रात गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यातील 83 टक्के जे काही करार आहेत, यात एफडीआय आहे. 16 टक्के गुंतवणूक अशी आहे ज्यात फायनॅनष्यल इंस्टीट्यूट असतील किंवा टेक्निकल आहेत, या गुंतवणुकीत एफडीआय कमी आहे, पण फॉरेन टेक्नॉलजी आहेत.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, एकूण किती देशातून गुंतवणूक आपल्याकडे येत आहे, याचा हिशोब लावला तर एकूण 18 देशातून ही गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यात अमेरिका, यूके, स्वित्झर्लंड, स्वीडन, सिंगापुर, नेदरलँड, जपान, इटली, यूएई, डेन्मार्क, नॉर्वे, फिनलंड, स्पेन, कॅनडा, बेल्जियम, ऑस्ट्रीया, अशा अनेक देशांतून गुंतवणूक येत आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्राचा परफॉर्मेंस सगळ्यात चांगला राहिला आहे. एक प्रकारे या कागदावरच्या घोषणा नाहीत. अनेकवेळा लोकांचा गैरसमज होत असतो, या गुंतवणुकीचा कालावधी जो असतो, हा 3 वर्षांपासून ते 7 वर्षांपर्यंत असतो.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, अनेक मोठ्या कंपन्या आपल्याकडे गुंतवणूक करण्यास तयार झाले आहेत. यासोबत कुठल्या क्षेत्रात गुंतवणूक येत आहे ते देखील महत्त्वाचे आहे. यात क्वांटम कम्प्यूटिंग, एआय डेटा सेंटर, एआय टेक्नॉलजी, इलेक्ट्रॉनिक्स, फॅब सेमीकंडक्टर्स, जीसीसी, आपल्याकडे नवीन वेव ही जीसीसीची आहे. तसेच फूड प्रोसेसिंग, रिनिवेबल एनर्जि, ग्रीन स्टील, ईव्ही, अर्बन ट्रांस्फॉर्मेशन, शिप बिल्डिंग, एड्युकेशन, फीनटेक, मॅजिस्टिक आणि टेक्सटाइल तसेच डिजिटलमध्ये गुंतवणूक आली आहे.

आता गुंतवणूक आली कुठे? तर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात ही गुंतवणूक आली आहे. कोकणचे क्षेत्र असेल किंवा एमएमआरचे क्षेत्र आहे, विदर्भात 13 टक्के गुंतवणूक आली आहे, 50 टक्के गुंतवणूक महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये आली आहे.

## महाराष्ट्रातील २९ महापालिकांसाठी महापौर आरक्षण सोडत जाहीर

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्रातील 29 महापालिकांसाठी महापौर पदाची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली असून, यामुळे आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले आहे. या सोडतीनुसार राज्यातील विविध महापालिकांमध्ये सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ओबीसी प्रवर्गासह महिलांसाठीही आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

**महापालिकानिहाय महापौर आरक्षण पुढीलप्रमाणे**

1) छत्रपती संभाजीनगर – सर्वसाधारण (महिला), 2) नवी मुंबई – सर्वसाधारण, 3) वसई-विरार – सर्वसाधारण, 4) कल्याण-डोंबिवली – अनुसूचित जमाती, 5) कोल्हापूर – ओबीसी, 6) नागपूर – सर्वसाधारण, 7) बृहन्मुंबई – सर्वसाधारण, 8) सोलापूर – सर्वसाधारण, 9) अमरावती – सर्वसाधारण (महिला), 10) अकोला – ओबीसी (महिला), 11) नाशिक – सर्वसाधारण, 12) पिंपरी-चिंचवड – सर्वसाधारण, 13) पुणे – सर्वसाधारण, 14) उल्हासनगर – ओबीसी, 15) ठाणे – अनुसूचित जाती, 16) चंद्रपूर – ओबीसी (महिला), 17) परभणी – सर्वसाधारण, 18) लातूर – अनुसूचित जाती (महिला), 19) भिवंडी-निजामपूर – सर्वसाधारण, 20) मालेगाव – सर्वसाधारण, 21) पनवेल – ओबीसी, 22) मीरा-भाईंदर – सर्वसाधारण, 23) नांदेड-वाघाळा – सर्वसाधारण, 24) सांगली-मिरज-कुपवाड – सर्वसाधारण, 25) जळगाव – ओबीसी (महिला), 26) अहिल्यानगर – ओबीसी (महिला), 27) धुळे – सर्वसाधारण (महिला), 28) जालना – अनुसूचित जाती (महिला) आणि 29) इचलकरंजी – ओबीसी.

### ब्रेकिंग न्यूज

#### महापौरपदाचे स्वप्न भंगले

पुणे (दै. संध्या) : पुणे महापालिकेवर भाजपने निर्विवाद वर्चस्व मिळवल्यानंतर महापौरपद कोणाकडे जाणार, याबाबत राजकीय हालचालींना वेग आला होता. मात्र गुरुवारी जाहीर झालेल्या महापौरपदाच्या आरक्षण सोडतीने अनेक इच्छुकांच्या आशांवर पाणी फेरले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांसाठी महापौरपद सर्वसाधारण महिला वर्गासाठी आरक्षित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईतील मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत ही आरक्षण सोडत पार पडली. पुणे महापालिका निवडणुकीत भाजपने तब्बल ११९ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. त्यामुळे महापौरपद भाजपकडेच जाणार, हे निश्चित मानले जात होते. मात्र आरक्षण अंतिम न झाल्याने महापौरपदाच्या नावावर सस्पेन्स कायम होता. याआधी २०१२ साली महापौरपद महिला ओबीसीसाठी तर २०१७ मध्ये सर्वसाधारण वर्गासाठी आरक्षित होते. त्या वेळी अनेक पुरुष नगरसेवकांना संधी मिळाली होती. यंदा मात्र महिला सर्वसाधारण आरक्षण जाहीर होताच भाजपमधील अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या महापौरपदाच्या महत्त्वाकांक्षा अपूर्ण राहिल्या आहेत.

#### खाणीत कामबंद आंदोलन सुरूच

तुमसर (दै. संध्या) : डोंगरी येथील भारत सरकारच्या अखत्यारितील ब्रिटिशकालीन खुल्या मॅग्नीज खाणीत कंत्राटी कामगारांचे कामबंद आंदोलन दुसऱ्या दिवशीही तीव्र झाले असून, खाण प्रशासन आणि कंत्राटदारांविरोधात कामगारांचा संताप शिगेला पोहोचला आहे. या आंदोलनामुळे अवघ्या दीड दिवसांत सुमारे २५० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दरम्यान, आंदोलनस्थळी भेट देत खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी कामगारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी खाण प्रशासनाला सात दिवसांच्या आत कंत्राटी कामगारांच्या सर्व मागण्या मंजूर करण्याचा अल्टिमेटम दिला. अन्यथा हा विषय थेट केंद्रीय इस्पात व खाण मंत्रालयाकडे मांडण्यात येईल.

## नागपुरात महापौर पदासाठी ‘आरक्षण फिक्सिंग’? : विजय वडेट्टीवारांचा आरोप

**नागपूर (दै. संध्या)**



नागपुरातील महापौर पदासाठी आरक्षणात घोळ घालण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. नागपूरमध्ये सर्वसाधारण महिला आरक्षण लागू होत असतानाच भाजपने आधीच आपली उमेदवार निश्चित केल्याचा दावा त्यांनी केला. भाजपकडून शिवानी दानी या महापौर पदाच्या उमेदवार असणार असल्याचे नावही वडेट्टीवार यांनी जाहीर केले. विजय वडेट्टीवार म्हणाले की, हे आरक्षण फिक्सिंग आहे, असे मी काही दिवसांपूर्वीच सांगितले होते. नागपुरात महापौर पदाचा उमेदवार आधीच ठरवण्यात आला असून आज मी त्यांचे नाव जाहीर करतो. शिवानी दानी या भाजपच्या महापौर पदाच्या उमेदवार असतील,असा घणाघाती आरोप वडेट्टीवार यांनी केला. आरक्षण प्रक्रियेत सुरू असलेल्या कथित गोंधळावर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी शिवसेनेच्या भूमिकेचे समर्थन केले. आरक्षणावर शिवसेनेने घेतलेले आक्षेप पूर्णपणे योग्य आहेत. गरज भासल्यास हे प्रकरण न्यायालयात जाण्याचीही शक्यता आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.

## एकनाथ शिंदेंची बार्गेनिंग पॉवर २ दिवसांत कळेल : सतेज पाटील

**कोल्हापूर (दै. संध्या)**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेत किती बार्गेनिंग पॉवर शिल्लक आहे हे पुढील दोन दिवसांत कळेल, असे काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी म्हटले आहे. मुंबई महापालिकेचे महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुले झाले आहे. पण हे पद कुणाला द्यायचे याचा निर्णय दिल्लीतच होणार आहे. तिथे शिंदे गटाची बार्गेनिंग पॉवर कळेल, असे ते म्हणाले.

आज मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत झाली. या सोडतीनंतर कोल्हापुरात बोलताना सतेज पाटील म्हणाले, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटले आहे. पण मुंबईच्या महापौरपदाचा निर्णय दिल्लीतच होईल. सत्ताधारी शिवसेना किती दबावाखाली आहे हे मागील 2-3 दिवसांत घडलेल्या घटनांवरून दिसून येते. शिंदे गटाची बार्गेनिंग पावर अजून शिल्लक आहे का? हे दोन दिवसांत कळेल. कोल्हापूर महापालिकेचे महापौरपदही शिवसेनेला मिळणार नाही. मिळालेच तर त्यांचे अभिनंदन करायला हवे.

ते पुढे म्हणाले, महापालिका निवडणुकीनंतर महापौर पदाचे आरक्षण असा प्रकार पहिल्यांदाच घडत आहे. नियम व कायदे सरकार म्हणेल तसे सुरू आहे. आज सोडत झालेले महापौर पदाचे आरक्षण मागील आरक्षण पाहून झाले आहे का? याची खात्री कोर्टाने केली पाहिजे. जिल्हा परिषदांच्या आरक्षणावेळी हा विचार झाला नव्हता. कोल्हापूर महापालिकेत शिंदे गटाला महापौर पद मिळणार नाही. यदाकदाचित त्यांना मिळाले तर त्यांचे कौतुकच करायला हवे. महायुतीमधील घटकपक्ष अनेक ठिकाणी निवडणूकपूर्व व निवडणूकीनंतर युती करून एकत्र आलेत. त्यामुळे महापौर निवडीत काही गडबड होईल असे वाटत नाही.

कोल्हापूर व इचलकरंजी या दोन्ही ठिकाणी ओबीसी आरक्षण पडले आहे. आता दोन्ही ठिकाणी मूळ भाजपचा महापौर होणार की नव्याने भाजपमध्ये आलेला महापौर होणार याची उत्सुकता कोल्हापूरकरांना लागली आहे. 20 वर्षे आमच्यविरोधात लढलेल्या कार्यकर्त्याला पद मिळते की नवख्याला? हे आम्हालाही पाहायचे आहे, असेही सतेज पाटील यावेळी भाजपवर निशाणा साधताना म्हणाले.

## पुणे, खडकी छावणी परिषद महापालिकेत सामील करण्याची प्रक्रिया प्रगतिपथावर; मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

**पुणे (दै. संध्या)**



पुणे आणि खडकी छावणी परिषद पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी दोन्ही छावणी परिषदांचा पालिकेत समावेश केला जात असल्याचे मंत्री मोहोळ बुधवारी (२१ जानेवारी) म्हणाले.

पुणे महानगरपालिका राज्यात आकाराने मोठी असलेली महापालिका आहे. दोन्ही छावणी परिषदांचा समावेश झाल्यानंतर पालिकेचा विस्तार होण्यासह जबाबदारी वाढणार आहे.

“उत्तम नागरी सुविधा मिळाव्यात या हेतूने पुणे आणि खडकी छावणी परिषदांचा महापालिकेत समावेश केला जात आहे. छावणी परिषदांचा महापालिकेत समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवणे माझी जबाबदारी आहे”, असे मोहोळ समावेशाच्या प्रक्रियेवर म्हणाले. अशा प्रकारचे समावेश देशभरात सुरु असल्याचे मंत्री मोहोळ यांनी सांगितले.

नागरिकांना उत्तम नागरी सुविधा मिळाव्यात यासाठी पुणे महानगरपालिकेचे विभाजन करणार का? या प्रश्नावर उत्तर देताना सध्यातरी विभाजनाची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. “मुंबईत सर्व व्यवस्थितपणे हताळले जात असताना पुण्यात होणार नाही का? भौगोलिकदृष्ट्या पुणे मुंबईच्या तुलनेत मोठं आहे. पण, सध्या गोष्टी हताळल्या जाऊ शकतात. भविष्यात याबाबत विचार केला जाऊ शकतो”, असे मोहोळ म्हणाले.

झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणामुळे पुण्याच्या पाणी पुरवठ्यावर ताण येत आहे, असे मोहोळ यांनी नमूद केले. दरम्यान, पाणी चोरी अथवा गळतीमुळे होणारे नुकसान लक्षात घेता मुळशी धरणाचा पर्यायही विचारात घेतला जाणार असल्याचे मोहोळ म्हणाले.

## बीडमध्ये माणुसकीला काळिमा!

**बीड (दै. संध्या)**



■ जिल्हा रुग्णालयाचा निर्दयी कारभार, वयोवृद्ध आजीला दरवाजासमोर झोपवत कर्मचारी पसार

बीड जिल्ह्यातून माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. जिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी आलेल्या वयोवृद्ध आजारी महिला रुग्णाला अत्यंत निर्दयी वागणूक देण्यात आल्याचे समोर आले आहे. सोनोग्राफीसाठी आलेल्या या महिलेला दाराच्या बाहेर झोपवत चक्क दार बंद करून कर्मचारी निघून गेले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर देखील चांगलाच व्हायरल झाला असून या प्रकारावर संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोनोग्राफीसाठी गेलेल्या आजी या जिल्हा रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर ॲडमिट होत्या. त्यांना डॉक्टरांनी सोनोग्राफीसाठी पाठवले होते. रुग्णालयाची लिफ्ट बंद असल्यामुळे तिसऱ्या मजल्यावरून काही सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांना स्ट्रेचरवर उचलून खाली आणले. सायंकाळी 6 वाजण्यापूर्वीच या आजी सोनोग्राफी सेंटरच्या समोर हजर होत्या. पण येथील महिला कर्मचाऱ्याने पावणे सहा वाजताच दरवाजा बंद केला. दरवाजासमोर त्या आजी खाली झोपलेल्या असताना देखील त्यांच्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करत या महिलेने दरवाजा बंद केला.

# मुख्यमंत्री असहाय्य आहेत का? महाड प्रकरणी हायकोर्टाचा संताप

**मंत्र्याच्या मुलाला अटक नाहीच; न्यायालयाचा सरकारला इशारा**

**मुंबई (दै. संध्या)**



महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान झालेल्या राड्याप्रकरणी मुख्य आरोपींना अटक करण्यात आलेल्या अपयशावर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणात मंत्री भरत गोगावले यांचा मुलगा विकास गोगावले याच्यासह इतर आरोपी अजूनही मोकाट असल्याने न्यायालयाने सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुख्यमंत्री इतके असहाय्य झाले आहेत की या प्रकरणात त्यांना काहीही करता येत नाही, अशा कठोर शब्दांत उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवत, मुख्यमंत्री आणि मंत्री भरत गोगावले यांच्याकडून थेट निर्देश घ्या, अशा सूचना सरकारला दिल्या आहेत. या निरीक्षणामुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणात विकास गोगावले याच्यासह त्यांचा पुतण्या महेश गोगावले, माजी आमदार माणिक जगताप यांचा मुलगा तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते श्रीयांश जगताप यांच्यावरही गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने या सर्व आरोपींबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतरही आरोपींना अटक होत नसल्यामुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सरकार गंभीर आहे की केवळ वेळकाढूपणा करत आहे, असा थेट सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे.

महाड राडा प्रकरणी बोलताना उच्च न्यायालयाने सरकारला शब्दातच फटकारले. सरकारला अटक करायची असेल तर 24 तासांत कोणालाही अटक होऊ शकते. मात्र, जेव्हा अटक करायची नसते, तेव्हा अशी प्रतिज्ञापत्रं सादर केली जातात, असे परखड निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या विधानातून सरकारवर दबाव आणत, कायद्याची अंमलबजावणी निवडक लोकांसाठी वेगळी आहे का, असा प्रश्न उपस्थित केला आहे. यामुळे महाराष्ट्रातील कायद्याचे राज्य प्रतिकूलरीत्या प्रभावित झाल्याची तीव्र नाराजीही न्यायालयाने व्यक्त केली.

महाड राडा नेमका कसा घडला, याकडे पाहिल्यास निवडणुकीच्या दिवशी महाड नगरपरिषदेच्या मतदानादरम्यान नवे नगर परिसरात अचानक तणाव निर्माण झाला होता. विकास गोगावले आणि सुशांत जाबरे यांच्या समर्थकांमध्ये आमनेसामने झाल्यानंतर जोरदार हाणामारी झाली. प्राथमिक माहितीनुसार, विकास गोगावले यांच्या समर्थकांनी सुशांत जाबरे आणि त्यांच्या अंगरक्षकावर मारहाण केली. याचवेळी जाबरे समर्थकांच्या अनेक वाहनांची तोडफोड करण्यात आली, ज्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला होता.

या हाणामारीदरम्यान परिस्थिती अधिक चिघळली. सुशांत जाबरे यांच्या समर्थकांनी विकास गोगावले यांना रिव्हॉल्व्हर दाखवल्याची माहिती समोर आली. त्यानंतर तोच रिव्हॉल्व्हर घेऊन विकास गोगावले थेट पोलिस ठाण्यात पोहोचल्याची बाबही चर्चेत आली. या प्रकारामुळे महाड शहरात मोठ्या प्रमाणात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना मोठा बंदोबस्त तैनात करावा लागला होता.

या घटनेनंतर महाड पोलिस ठाण्यात दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांवर परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले. मात्र, आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले गेल्यानंतरही हे सर्व आरोपी फरार झाले. तेव्हापासून विशेषतः विकास गोगावले यांना अटक करण्यात पोलिसांना अपयश येत असल्याने संशय अधिक गडद होत आहे. न्यायालयात वारंवार सुनावणी होऊनही ठोस कारवाई होत नसल्याने पोलिस प्रशासनावर राजकीय दबाव आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## संपादकीय

# विक्षिप्त साम्राज्यवादी

सार्‍या जगात मनमानी पद्धतीने हस्तक्षेप करण्यासाठी भौगोलिकदृष्ट्या मोक्याच्या जागा आपल्या ताब्यात हव्यात, ही त्यांना लागलेली आस साम्राज्यवादाचं ढळढळीत लक्षण आहे. ट्रम्प यांची खरी आगपाखड ब्रिटनविरोधात नाही. ती भारताविरोधात आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांना भारताने पटवलं आणि त्यांच्याकडून एक संपूर्ण द्विपसमूह काढून घेतला, ही बाब ट्रंप यांना बोचते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची जी घातक रूपं जगासमोर आली आहेत, त्यातलं सगळ्यात ठळक रूप आहे, विक्षिप्त साम्राज्यवाद्याचं. जगाने ॲडॉल्फ हिटलर या जर्मनीच्या क्रूरकर्मा, विक्षिप्त साम्राज्यवाद्याला पाहिलं आहे. त्याच्याविषयी भरपूर साहित्य आणि अभ्यास उपलब्ध आहे. त्यावर असंख्य चर्चासत्रं झडली आहेत. साम्राज्यवादी विक्षिप्त असतात, की विक्षिप्त सर्व सत्ताधीश झाल्यानंतर साम्राज्यवादी होतात, याचे उत्तर मानसतज्ज्ञांनी त्यात दिलं आहे. ट्रम्प यांच्या निमित्ताने त्या सार्‍या अभ्यासावरील धूळ पुन्हा एकदा झटकण्याची वेळ आली आहे, असं दिसतं. ग्रीनलँडसाठी डेन्मार्कला धमकावल्यानंतर ट्रम्प यांची वक्रदृष्टी आता हिंद महासागरातील दिएगो गार्सिया या बेटाकडे वळली आहे. मॉरिशसवरील ताबा सोडताना इंग्लंडने दिएगो गार्सिया हे बेटही मॉरिशसकडे सुपूर्द केलं, यावरून ट्रम्प यांनी मंगळवारी ब्रिटनचे पंतप्रधान किर स्टॅमर यांचे कान उपटले. गंमत म्हणजे, हे दिएगो गार्सिया बेट ज्या चागोस द्विपसमूहाचा भाग आहे, त्या द्वीपसमूहाबाबत गेल्याच वर्षी मे महिन्यात ब्रिटन आणि मॉरिशसमध्ये झालेल्या सामंजस्य करारावरून ट्रम्प यांनी स्तुतिसुमनं उधळली होती. 'ऐतिहासिक घटना' असं त्यांनी त्या करार प्रक्रियेचं वर्णन केलं होतं. घटनेला एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच तो सामंजस्य करार ट्रम्प यांना ब्रिटनचा मूर्खपणा वाटू लागला आहे. ब्रिटनने आपल्या 'सुरक्षेशी केलेली तडजोड' या शब्दात ट्रम्प यांनी परवा आगपाखड केली. डावोसला रवाना होण्यापूर्वी ट्रम्प यांनी मंगळवारी तीन गोष्टी केल्या : १) कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बनवलेल्या नकाशात त्यांनी ग्रीनलँड, कॅनडा आणि व्हेनेझुएला या तीन स्वतंत्र भूभागांना अमेरिकेच्या नकाशाचा भाग बनवून टाकलं! २) फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युएल मॅक्रों यांनी ट्रम्प यांना पाठवलेल्या खासगी मेसेजना उघड केलं. राजनैतिक संकेतांचा हा मोठा भंग मानला जातो. ३) चागोस द्वीपसमूह मॉरिशसला दिल्याबद्दल त्यांनी ब्रिटनला बोल लावले. या द्वीपसमूहातील दिएगो गार्सिया हे बेट आपल्याला हवं, अशी उघड मागणी त्यांनी केली. हे दिएगो गार्सिया बेट ब्रिटनने मॉरिशसकडे सोपवण्यामागे भारताची महत्त्वाची भूमिका आहे. हिंद महासागरात चीनला शह देण्यासाठी जागोस द्वीपसमूह मॉरिशसकडे असणं भारताच्या त्यातल्या त्यात सोयीचं असल्याने हा द्वीपसमूहही ब्रिटनने मॉरिशसचा ताबा सोडतानाच मॉरिशसला द्यावा, यासाठी विशेष प्रयत्न केले होते. दोन शतकांपेक्षा अधिक काळ ब्रिटनच्या अधिपत्याखाली असलेला मॉरिशस जेव्हा स्वतंत्र झाला, तेव्हा ब्रिटनने मॉरिशस सोडताना जो करार केला, त्यात दिएगो गार्सिया हे बेट मॉरिशसला दिलं, पण ९९ वर्षांच्या कराराने ते वापरण्यासाठी पुन्हा आपल्या ताब्यात घेतलं. या करारांमध्ये येती ९९ वर्षे तिथे ब्रिटन आणि अमेरिकी सैन्याचा तळ राहणार असला, ते ब्रिटनलाच वापरायला मिळणार असलं, तरी बेटावर मालकी हक्क मॉरिशसचाच राहणार आहे. ट्रम्प यांना हे मान्य नाही. त्यांच्या मते, या बेटाची; संपूर्ण चागोस द्वीपदी समूहाची मालकी आपल्याकडेच असायला हवी. आपली इच्छा त्यांनी आंतरराष्ट्रीय संकेतांच्या विपरीत, विक्षिप्तपणे मांडली असली, तरी या इच्छेतून त्यांच्यातला साम्राज्यवादीच डोकावतो आहे, हे लक्षात घ्यायला हवं. दिएगो गार्सिया हे हिंद महासागरातल्या चागोस द्वीप समूहातील साधारण ३० चौरस किलोमीटरचं. पण, हे बेट अशा मोक्याच्या जागी आहे, की या बेटावरून अमेरिका - ब्रिटनचं सैन्य एकाच वेळी आशिया, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या तीनही खंडांवर नजर ठेवू शकतं. बहुतेक सगळी तेलवाहू जहाजही मलाक्का आणि हार्मुज या सामुद्र धुनीतूनच प्रवास करतात. दिएगो गार्सिया बेट ताब्यात असेल, तर या जहाजांचा मार्ग केव्हांही रोखता येतो.

## संस्कृत सुभाषित

अनिर्वेदेन दीर्घेण निश्चयेन ध्रुवेण च
देवदेवप्रसादाच्च क्षिप्रं फलम्वाप्यते ।
(शांतीपर्व, अध्याय १५३, ११७, महाभारत)
अर्थ : दीर्घोद्योगाने, दृढनिश्चयाने व ईश्वरी कृपेने सत्वर कार्यसिद्धी होते.

## गुरु वचन

### सर्वोत्कृष्ट शाकाहार – लजपत राय सभरवाल

आपण सर्व जीवांना ईश्वराचा अंश मानतो म्हणून आपल्या धर्मग्रंथांमध्ये मांसाहार वर्ज्य करण्यास सांगितले आहे. महाभारतात भिष्म पितामह यांनी मांस खाणारा, मांस विकणारा व मांसासाठी जीवाची हत्या करणाऱ्यांना दोषी ठरवले आहे. म्हणून सर्व धर्मग्रंथांमध्ये शाकाहारच सर्वोत्कृष्ट आहार असल्याचे सांगितले आहे.

संत, महापुरुष यांनी सुद्धा सांगितले आहे की, शाकाहारामुळे आपले विचार सकारात्मक होतात तसेच दया व साहस गुण विकसित होतात.

विचारांवर प्रभाव शाकाहारामुळे आपले विचार प्रभावित होतात. जर आपणास मन, वचन व कर्माने पवित्र व्हायचे असेल तर आपण शाकाहार म्हणजे फळ–भाज्यांचा पूर्ण आहारच घ्यायला हवा. खरंतर, बहुतांश मानवी मनाच्या एका कोपऱ्यात पशु व्यवहार दडलेला असतो. जर आपणास त्या पशुत्वातून मुक्त व्हायचे असेल तर मांसाहार सोडायलाच पाहिजे.

आपण फक्त जीभेचे चोचले पुरवण्यासाठी दुसऱ्या जीवांची हानी करणे टाळून त्यांच्या संरक्षणासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे म्हणून पौष्टिक व ज्या आहारामुळे कुठल्याही जीवाची हानी होणार नाही असा आहार घ्यायला हवा. आहार साधन असून, साध्य नाही. शाकाहार कुठल्याही व्यक्तीच्या जगण्याची शैली निर्धारित करतो. असा आहार मन व शरीराला मजबूत करतो. शाकाहारामुळे फक्त आपले विचारच शुद्ध न होता आपल्यात दया, क्षमा सारख्या भावनांचा विकास होतो. आपण जगण्यासाठी जेवण करतो, जेवणासाठी जगत नाही याचा विसर पडायला नको. म्हणूनच आहार एक साधन असून साध्य नाही.

## उपदेशकथा

### जिद्द

डॉ. येलप्रगदा सुब्बाराव हे आंध्र प्रांतातील एक विख्यात वैद्य होते. त्यांच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. त्यांच्या भावाचा मृत्यू स्प्रू म्हणजे प्रवाहिका नावाच्या रोगाने झाला. त्यावर त्यावेळी औषध नसल्याने ते औषध तयार करण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली व ती शेवटी सिद्धीस नेली. मद्रास विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. मित्रमंडळींच्या सहाय्याने ते इंग्लंडला गेले. लंडन विद्यापीठात प्रवेश केला. नंतर अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवून १९३० मध्ये त्या विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. तेथेसुद्धा पैशाच्या अडचणीमुळे हॉस्पिटलमधील शिपायाचे काम करणे, प्रयोगासाठी बेवारशी कुत्री व मांजरे पकडणे वगैरे हलकी कामे करावी लागली पण त्यांनी त्यात कमीपणा मानला नाही. दूध व शिजवलेले पावटे हा त्यांचा आहार होता. लॅडर्ली लॅबोरेटरीचे १९४२ मध्ये प्रमुख झाले. टेरॉप्टेरिन व ॲमिनॉप्टिरिन नावाची कर्करोगावर व ल्युकेमियावर उपयोगी पडणारी औषधे त्यांनी तयार केली. लेडर्ली संस्थेतील वाचनालयास व भारतातील त्या कंपनीच्या कारखान्यास त्यांचे नाव देण्यात आले.

कथा उपदेश : जिद्दीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते व नाव कमावता येते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:परिध १५:५८:२९ |
| २३ जानेवारी २०२५ | करण:बव १४:१०:२५ |
| शुक्रवार | करण:बालव |
| विक्रम संवत्– २०८२ | २५:४६:१८+ |
| माघ शीर्ष शके | सूर्य:मकर |
| संवत्– १९४७ | चन्द्र:मीन०८:३३:२२ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शाबान |
| मास– माघ | तारीख – ३ |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | वसंत पंचमी |
| तिथि:पंचमी २५:४६:१८+ | शांतादुर्गा रथोत्सव |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद | श्री पंचमी |
| १४:३२:४३ | नेताजी सुभाष जयंती |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 5 | | | 8 | | 6 | |
| | | 6 | 1 | 4 | | | | |
| | 9 | 8 | | 6 | | 7 | | |
| | | 1 | 7 | 2 | | | | 6 |
| 2 | 6 | | | | | | 7 | 5 |
| 5 | | | | 3 | 4 | 1 | | |
| | | 4 | | 7 | | 9 | 1 | |
| | | | | 5 | 1 | 6 | | |
| | 1 | | 4 | | | 5 | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८४१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 9 | 5 | 4 | 7 | 6 | 2 | 8 | 1 |
| 4 | 7 | 6 | 1 | 2 | 8 | 5 | 9 | 3 |
| 8 | 2 | 1 | 5 | 3 | 9 | 4 | 7 | 6 |
| 9 | 5 | 3 | 2 | 8 | 4 | 6 | 1 | 7 |
| 1 | 6 | 2 | 3 | 9 | 7 | 8 | 4 | 5 |
| 7 | 4 | 8 | 6 | 1 | 5 | 9 | 3 | 2 |
| 2 | 8 | 7 | 9 | 6 | 1 | 3 | 5 | 4 |
| 6 | 1 | 4 | 8 | 5 | 3 | 7 | 2 | 9 |
| 5 | 3 | 9 | 7 | 4 | 2 | 1 | 6 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५५६ – जगातील सर्वात मोठा भूकंप चीनच्या शांक्सी प्रांतात घडला. अंदाजे ८,३०,००० ठार.
- १५७९ – युट्रेख्टचा तह मंजूर. नेदरलँड अस्तित्त्वात.
- १७१९ – रोमन पवित्र साम्राज्यात लिच्टेन्स्टेन या राज्याची निर्मिती.
- १८५५ – मिनेसोटात मिनीआपोलिसमध्ये मिसिसिपी नदीवर पहिला पूल बांधला गेला.
- १८७० – मोन्टानात अमेरिकन घोडदलाने १७३ बायका व मुलांची कत्तल केली.
- १९४३ – दुसरे महायुद्ध – ब्रिटीश सैन्याने लिब्याची राजधानी ट्रिपोली जिंकले.

### राष्ट्रीय

- १९९३ – इंडियन एअरलाईन्स बी ७३७ ला औरंगाबादेत अपघात, ६१ ठार.
- २००८ – मुंबईचे सहपोलीस आयुक्त (प्रशासन) हेमंत करकरे यांची एटीएसच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली.

### जन्म

- १७१९ – जॉन लँडन, इंग्लिश गणितज्ञ यांचा जन्म.
- १७३७ – जॉन हॅन्कॉक, अमेरिकन क्रांतिकारी यांचा जन्म.
- १८९७ – नेताजी सुभाषचंद्र बोस, भारतीय क्रांतिकारी यांचा जन्म.
- १९२६ – बाळासाहेब ठाकरे, शिवसेनाप्रमुख यांचा जन्म.
- १९४७ – मेगावती सुकर्णो पुत्री, इंडोनेशियाची राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- १००२ – ऑट्टो तिसरा, पवित्र रोमन सम्राट यांचे निधन.
- ११९९ – याकुब, खलिफा यांचे निधन.
- १५६७ – ज्याजिंग, चीनी सम्राट यांचे निधन.

## : SMS :

Apna Purse kholo
Or usme se 500
Ka Note Nikalo..
Gandhiji Ka Photo
Dekh Kar Bolo "
Happy Birthday
" BAPU"
Wo Note Le Kar
Kal Milo " Birthday
CELEBRETE
Karenge..
Mahtma Ganghi
Jaynti...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६.५ | १७.६ |
| अहमदनगर | २६.१ | १७ |
| अकोला | २८.५ | १८.३ |
| अमरावती | २८ | १८.२ |
| बीड | २९.१ | १७.४ |
| भंडारा | २८.५ | १६.१ |
| बुलढाणा | २१.४ | ९.४ |
| चंद्रपूर | २९.३ | १७.२ |
| चेन्नई | २८.९ | १८.३ |
| नवी दिल्ली | २१.९ | १०.६ |
| धुळे | २८.२ | १७.९ |
| गोंदिया | २७.८ | १५.४ |
| जळगाव | २८.३ | १७.८ |
| कोल्हापूर | २७.६ | १६.२ |
| लातूर | २७.४ | १७.३ |
| मुंबई | २९ | २१.६ |
| नागपूर | २८ | १६.५ |
| नांदेड | २८.१ | १७.८ |
| नंदूरबार | २६.३ | १८.७ |
| नाशिक | २७.२ | १६.७ |
| पुणे | २६.६ | १६.२ |
| पंढरपूर | २७.९ | १७.५ |
| सातारा | २७.५ | १५.३ |
| सांगली | २८ | १६.७ |
| सोलापूर | २८.१ | १८.१ |
| वर्धा | २८.७ | १७.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व
आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व
चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा :पश्चिम
जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा.

**मकर :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
मनोधर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.


**सिंह :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण
केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल.

**मीन :** शुभ रंग : काळा,शुभ दिशा:पूर्व
आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. आर्थिक फायदा होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४२



### आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर
१८. उष्ण
१९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

### उभे शब्द

१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक
१५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा
२५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका
३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड
७६. पडसे

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वानगी ३.बातमीदार ७.चमचम १०.कव १०अ.ममता १२.नमकहराम १४.आडाखा बांधणे १७.मळ १८.काना १९.रचना २१.आपादमस्तक २३.भाकरी २५.रकाना २७.वीर २९.तडा ३०.जहाज ३२.रसद ३४.सालस ३६.जारणमारण ३८.मस ४०.बरकत ४१.गड ४२.खस ४३.काडीमोड ४४.गर ४५.अर्चना ४६.सरकार ४८.सहाणखोड ५०.आसपास ५१.जाण ५२.पतदार ५५.मोहनदास ५७.नजरानजर ६१.सतत ६३.नवी ६४.राखणदार ६७.लवकर ६८.रामदास ७१.वास ७२.लकवा ७३.कणीक ७४.खप ७६.रस्ता ७७.बाप्पा ७८.रवाळ ७९.सरबत

उभे उत्तर : १.वाकडातिकडा २.नवखा ३.बाता ४.मीन ५.दाम ६.रकमपात ७.सारा ८.मग ९.महिना १०.मध ११.मणेर १३.हळद १५.बांग १६.विनाकारण १८.काकवी २०.चर २२.मतलब २३.भातपोळी २४.वहाण २६.नारा २८.रजत ३०.जरड ३१.जमाखर्च ३३.दमडी ३५.सरदार ३६.जागरण ३७.रसना ३९.समोरासमोर ४३.कापूस ४४.गहाणखत ४५.अडत ४६.सधन ४६अ.कानस ४७.रक्षा ४८.सजा ४९.खोपट ५३.दानवीर ५४.सरसरीत ६१.सतलज ६२.तलवार ६३.नकटी ६५.खसखस ६६.दावा ६९.मकर ७०.सबळ ७३.कप्पा ७५.पर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गणेशजन्मानिमित्त सारसबाग सिद्धिविनायकाला मानाची पेशवाई पगडी

■ श्री देवदेवेश्वर संस्थानअंतर्गत सारसबाग सिद्धिविनायक मंदिरात माघी गणेश जयंती उत्सव उत्साहात साजरा

पुणे (दैनिक संध्या) : माघी गणेश जयंती उत्सवानिमित्त श्री देवदेवेश्वर संस्थान अंतर्गत असलेल्या सारसबाग येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात गणेशजन्म सोहळा भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. माघी गणेश जयंती निमित्त श्री सिद्धिविनायक गणपतीला मानाची पेशवाई पगडी परिधान करण्यात आली यासोबतच श्री गणेशाला भरजरी वस्त्र, सोन्याचे दागिने देखील परिधान करण्यात आले होते. मंदिरात करण्यात आलेली रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. सकाळपासूनच सिद्धिविनायक देवतेच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी श्री देवदेवेश्वर संस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश भागवत, तसेच विश्वस्त सुधीर पंडित, पुष्करसिंह पेशवा, जगन्नाथ लडकत आणि आशिष कुलकर्णी उपस्थित होते. माघी गणेश जयंतीनिमित्त संस्थान अंतर्गत असलेल्या लक्ष्मीनगर येथील श्री रमणा गणपती मंदिर तसेच पौड फाटा येथील श्री दशभूजा गणपती मंदिर येथेही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संस्थानचे मुख्य विश्वस्त रमेश भागवत यांच्या हस्ते सारसबाग येथील श्री सिद्धिविनायक मंदिरात महापूजा व याग संपन्न झाला. तर श्री दशभूजा गणपती मंदिरात विश्वस्त जगन्नाथ लडकत यांच्या हस्ते आणि श्री रमणा गणपती मंदिरात पुष्करसिंह पेशवा यांच्या हस्ते महापूजा व याग विधी पार पडले.

### ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिरात गणेश जन्म 'महाआरती'



पुणे (दैनिक संध्या) : मोरया, मोरया.... श्री जयति गजानन, कसबा गणपती बाप्पा मोरया... च्या नामघोषाने ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर देवस्थान चा परिसर भक्तीमय झाला. ट्रस्टच्या वतीने मंदिरात माघ गणेश जन्मोत्सव कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याअंतर्गत श्री गणेशजन्म आरती सोहळा थाटात पार पडला. तब्बल सव्वा तास मोरया गोसावी यांनी रचलेल्या विविध आरत्या आणि पदे मंदिरात म्हणण्यात आली. देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विनायक बाजीराव ठकार यांसह खजिनदार हेरंब ठकार, विश्वस्त संगीता ठकार, स्वानंद ठकार, आशापूरक ठकार, मिहीर ठकार, मंदार ठकार, तेजस ठकार, हर्षद ठकार हे विश्वस्त मंडळ व सर्व ठकार पुजारी यांनी उत्सवाचे आयोजन केले आहे. पुजारी आल्हाद ठकार, ओंकार ठकार, पल्लवी ठकार, आरती ठकार, सीमा ठकार, सुधा ठकार, मधुरा ठकार यांसह गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य दैवत श्री जयति गजानन कसबा गणपती मूर्तीच्या शेंदूर कवच काढल्यावर आत अतिशय मनोहरी अशी मूळ स्वरूपातील मूर्ती समोर आली आहे. त्यानंतर हा जन्मोत्सव मंदिरात होत असल्याने याला विशेष महत्व आहे. गणेश जयंतीच्या दिवशी अथर्वशीर्ष पठ्ण व शंखनाद गजर, दुपारी १२.१५ ते १.३० यावेळेत श्री गणेशजन्म आरती सोहळा पार पडला. तर, रात्री ९.३० वाजता शेजारती व छबिना झाला. महिनाभर सुरु असलेल्या गणेशपुराण प्रवचनाची सांगता देखील गणेशजयंतीच्या दिवशी झाली. दररोज विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये दररोज सकाळी ७ वाजता डॉ.पं.प्रमोद गायकवाड आणि शिष्य यांचे सनई चौघडा वादन, सकाळी ९.३० वाजता श्रीं ना अभिषेक, दुपारी ४.३० वाजता महाडकर गुरुजी यांचे गणेशपुराण दररोज पार पडले. पं.शैलेश भागवत यांचे शहनाईवादन, स्वरसंजीवन म्युझिकल प्रस्तुत भावभक्तीरंग हा कार्यक्रम, भज-मन हा भावभक्तीगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# तिसऱ्या टप्प्यात कॅमेरून स्कॉटची सरशी

**ल्यूक मुडग्वेचे पिवळ्या जर्सीवर वर्चस्व कायम : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण**



**आज, शुक्रवारी शेवटचा टप्पा**

आता सर्वांचे लक्ष चौथ्या टप्प्याकडे म्हणजेच 'पुणे प्राईड लूप'कडे लागले आहे. हा टप्पा ९५ किलोमीटरचा असून, तो पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाडा आणि आधुनिक भागांमधून जाणार आहे. बालेवाडी ते जे. एम. रोड असा टप्पा असणार आहे. ल्यूकने यलो जर्सी राखली असली, तरी इतर स्पर्धकांमधील सेकंदांचे अंतर पाहता अंतिम टप्पा अत्यंत रोमांचक होणार आहे.

पुणे (दै. संध्या) : 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' चा तिसरा टप्पा आतापर्यंतचा सर्वात आव्हानात्मक ठरला. पश्चिम घाटाच्या प्रवेशद्वारावर सायकलस्वारांच्या कौशल्याची आणि सहनशक्तीची मोठी परीक्षा पाहायला मिळाली. शर्यतीच्या या आव्हानात्मक तिसऱ्या टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाचा कॅमेरून निकोलस स्कॉट याने बाजी मारली. त्याने १३७ किलोमीटरचा हा टप्पा ३ तास ४ मिनिटे आणि १३ सेकंदांत पार केला. अर्थात, क्रमवारीत अव्वल क्रमांक कायम राखून ल्यूक मुडग्वे याने 'यलो जर्सी'वरील वर्चस्व कायम राखले आहे.

सासवड नगर परिषदेच्या चंदन टेकडी येथून दुपारी १२:३० वाजता या टप्प्याला सुरुवात झाली. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी हिरवा झेंडा दाखवून या शर्यतीचा शुभारंभ केला. या वेळी राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्ष आनंदी जगताप, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सचिव संजय शेटे आदी उपस्थित होते. 'भारत माता की जय', 'जय भवानी जय शिवाजी', 'गणपती बाप्पा मोरया' अशा घोषणांनी शाळेच्या मुलांनी आणि उपस्थित नागरिकांनी परिसर दणाणून सोडला.

यानंतर सायकलपटूंनी बारामतीच्या दिशेने कूच केले आणि विद्या प्रतिष्ठानच्या पेन्सिल चौक येथील फिनिश लाईनच्या जवळ आले, तेव्हा शर्यत अधिक तीव्र झाली. तीन तास खेळाडूंमध्ये जबरदस्त चुरस बघायला मिळाली. यात स्कॉट सर्वांत वेगवान ठरला. अंतिम टप्प्यात स्कॉटने वेग वाढवला. यात त्याने स्पेनच्या बुर्गोस बुर्पेललेट बीएच संघाच्या जॉर्जिओस बुग्लासला (३ तास ०४ मिनिटे १३ सेकंद) मागे टाकले. तो दुसऱ्या क्रमांकावर राहिला. बेल्जियमच्या टार्टेलेटो-आयसोरेक्स संघाचा तिमोथी ड्युपॉन्ट (३ तास ०४ मिनिटे १३ सेकंद) तिसऱ्या स्थानावर राहिला. मलेशियाच्या तेरेंगानू सायकलिंग टीमचा झेब कायफिन चौथ्या क्रमांकावर राहिला. पहिल्या दोन टप्प्यांचा विजेता ल्यूक (३ तास ०४ मिनिटे १३ सेकंद) या वेळी सहाव्या स्थानावर राहिला. मात्र, त्याने 'बेस्ट स्प्रिंटर'साठीची हिरवी जर्सी मिळवली आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एकूण क्रमवारीत अव्वल स्थान कायम राखून 'पिवळी जर्सी' स्वतःकडेच ठेवली. तीन टप्प्यांनंतर ल्यूक एकूण ७ तास ३६ मिनिटे १० सेकंद वेळेसह पहिल्या स्थानावर आहे. थायलंडच्या रुजाई इन्शुरन्स विन्स्पेसच्या कार्टर ॲलन बेटल्सपेक्षा तो केवळ १४ सेकंदांनी पुढे आहे.

**महत्त्वाच्या जर्सी आणि विजेते**

यलो जर्सी (एकूण विजेता) - ल्यूक मुडग्वे

ग्री जर्सी (बेस्ट स्प्रिंटर) - जॉर्जिओस बुग्लास (बुर्गोस बुर्पेललेट बीएच)

पोल्का डॉट जर्सी (किंग ऑफ माउंटेन्स) - क्लेमेंट अलेनो (बुर्गोस बुर्पेललेट बीएच)

ऑरेंज जर्सी (बेस्ट एशियन रायडर) - जंबालजाम्तस सैनबायर (बुर्गोस बुर्पेललेट बीएच)

व्हाइट जर्सी (बेस्ट यंग रायडर )- व्हिएगो टिजसेन (विलरप्लोईग ग्रूट ॲमस्टरडॅम)

ब्लू जर्सी (भारताचा सर्वोत्तम खेळाडू) - हर्षवीर सिंग सेखॉन

हा टप्पा अनेकांच्या अपेक्षेपेक्षा जास्त कठीण होता. सुरुवातीचे दोन चढण मार्ग आव्हानात्मक होते आणि वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने सायकल चालवणे कठीण जात होते; पण वळणदार रस्त्यांवर सायकल चालवताना मला खूप मजा आली.
**- कॅमेरून स्कॉट**

# पराक्रमाने धगधगणाऱ्या शनिवार वाड्याचा वाढदिवस साजरा



■ 'हर हर महादेव'च्या जयघोषात उघडला दिल्ली दरवाजा

पुणे (दै. संध्या) : 'हर हर महादेव' अशी घोषणा देत मराठा साम्राज्याच्या वैभवशाली इतिहासाचा साक्षीदार असलेल्या शनिवार वाड्याचा दिल्ली दरवाजा उघडण्यात आला. फुलांची सजावट, वाड्याच्या प्रवेशद्वारावर सुंदर रांगोळी आणि थोरले बाजीराव पेशवे तसेच नानासाहेब पेशवे यांना अभिवादन करीत शनिवार वाड्याचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

पेशव्यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक शनिवार वाड्याचा २९४ वा वर्धापन दिनानिमित्त थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानतर्फे शनिवार वाड्याचा वर्धापन दिन समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार हेमंत रासने, भाजप प्रदेश महामंत्री राजेश पांडे, नगरसेवक कुणाल टिळक, प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त), इतिहासतज्ज्ञ मोहन शेटे, सूर्यकांत पाठक, अशोक गुंदेचा, सचिव कुंदन कुमार साठे, श्रीकांत नगरकर, मकरंद माणकीकर, आशुतोष नगरकर, उमेश देशमुख, सचिन बोधनी, विश्वनाथ भालेराव आदी उपस्थित होते.

आमदार हेमंत रासने म्हणाले, ज्या छत्रपती शिवरायांना स्मरून थोरले बाजीराव पेशवे यांनी अटकेपार झेंडा नेला, तो इतिहास जाज्वल्य आहे. पराक्रमाची साक्ष देणारा शनिवार वाडा पुन्हा पूर्वीप्रमाणे सात माडी शनिवार वाडा व्हावा आणि त्याला गतवैभव प्राप्त व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू असून शनिवार वाड्याच्या तीनशेव्या वर्धापन दिनापर्यंत ते साध्य होईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

कुंदनकुमार साठे म्हणाले, पुण्याच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या नानासाहेब पेशवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे स्वारगेट मेट्रो स्टेशनला नानासाहेब पेशवे यांचे नाव देऊन त्या ठिकाणी त्यांच्या स्मृती जपणारे भव्य स्मारक उभारावे. यानिमित्ताने पुण्याच्या गौरवशाली इतिहासाची आठवण नागरिकांना होईल.



### मंडईच्या शारदा गणपती मंदिरात गणेश जन्मोत्सव उत्साहात साजरा

पुणे (दै. संध्या) : शारदा गणपतीला फुलांची केलेली आकर्षक सजावट, मंदिरासमोर काढलेली रांगोळी आणि फुलांनी सजवलेला पाळणा अशा भक्तिमय वातावरणात अखिल मंडई मंडळाच्या शारदा गणपती मंदिरात पारंपारिक पद्धतीने गणेश जन्म साजरा करण्यात आला. ...'कैलास पार्वती आनंद झाला.. तेजस्वी बालक जन्मास आला' 'सुखहर्ता दुखहर्ता म्हणतात तुला, जो बाळा जो जो रे जो' हा पाळणा म्हणत गणेश भक्तांनी गणेश जन्माचा आनंद सोहळा साजरा केला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, आळंदी देवस्थानच्या प्रथम महिला विश्वस्त ॲड. रोहिणी पवार, सचिव विश्वास भोर, सुचेता थोरात, अनुजा थोरात, साधना मते, मोनाली मोरे, विद्या घाणेकर काकू, अंकु थोरात, रुही शहा, सावी शहा, विजया शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. अण्णा थोरात म्हणाले, गणेश जयंतीनिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ६ वाजल्यापासून अभिषेक व गणेश याग करण्यात आला, तर सायंकाळी पालखी पूजन व नगर प्रदक्षिणा मिरवणूक भक्तिभावात पार पडली. यंदा शारदा गजाननासाठी करण्यात आलेली वैशिष्ट्यपूर्ण फुलांची सजावट भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली.

# अझीम प्रेमजी विद्यापीठाने शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया केली सुरू

पुणे (दै. संध्या) : अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु विद्यापीठ प्रांगणात (कॅम्पस) शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू केल्याची घोषणा केली आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन) अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदविका, शैक्षणिक मूल्यमापनामध्ये पदव्युत्तर पदविका, अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांना शिकवण्यासाठी पदव्युत्तर पदविका आदी अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख १२ फेब्रुवारी २०२६ आहे. हा एक वर्षाचा अर्धवेळ पदविका अभ्यासक्रम असून, यामध्ये सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम मिश्र स्वरुपात (ऑनलाइन आणि कॅम्पसमध्ये प्रत्यक्ष सत्रे) राबवला जाईल. नियमित शालेय क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांच्या उच्च-गुणवत्तेच्या व्यावसायिक विकासासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या लवचिक रचनेमुळे कार्यरत शिक्षकांना आपले काम सांभाळून शिक्षण घेणे शक्य होणार आहे. हा पदविका अभ्यासक्रम शिक्षण क्षेत्रातील कार्यरत शिक्षकांसाठी तयार करण्यात आला आहे. त्यासाठी शालेय शिक्षक आणि शिक्षक-प्रशिक्षक, विशेष शिक्षक, शालेय पदाधिकारी, सरकारी संस्था, खासगी संस्था किंवा शालेय प्रणालीशी संबंधित स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक अर्ज करू शकतात. अर्जदारांकडे किमान दोन वर्षांचा संबंधित कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशनचे संचालक अंकुर मदन म्हणाले, "हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना पूर्व प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, अध्ययन अक्षमता आणि मूल्यमापन यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन प्रदान करतात. हे अभ्यासक्रम अशा प्रकारे डिझाईन करण्यात आले आहेत की, ज्यामुळे कार्यरत शिक्षक/शिक्षणतज्ज्ञांना त्यांचे शिक्षण मुले आणि सहकाऱ्यांबरोबरच्या दैनंदिन व्यवहारात वापरता येईल. तसेच, स्वतःच्या कामातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा चिकित्सकपणे विचार करण्यास आणि त्यांची उत्तरे शोधण्यासही हे अभ्यासक्रम त्यांना प्रोत्साहित करतात."


अधिक माहितीसाठी: अर्ज करण्यासाठी आणि अभ्यासक्रम, पात्रता व शुल्काच्या अधिक तपशीलांसाठी https://azimpremjiuniversity.edu.in/pg-diplomas-and-certificates/education येथे क्लिक करा.

**अभ्यासक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये**

- एक वर्षाचा, अर्धवेळ मिश्र स्वरुपाचा पदविका अभ्यासक्रम (हायब्रीड फॉरमॅट).
- ऑनलाइन वर्ग आणि बंगळूरु विद्यापीठ प्रांगणात प्रत्यक्ष सत्रांचा समावेश.
- प्रत्येक पदविका अभ्यासक्रमात प्रत्येकी १२ आठवड्यांच्या चार प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश.
- पूर्ण पदविका अभ्यासक्रम किंवा वैयक्तिक प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी नोंदणी करण्याची लवचिक सुविधा.

**उत्साही प्रवाशांसाठी डिझाइन केलेल्या ओप्पो रेनो १५ प्रो ५जी आणि ओप्पो रेनो १५ प्रो मिनी ५जी मध्ये विविध प्रवासी फोटोग्राफीसाठी बनवलेला २०० एमपी अल्ट्रा-क्लीअर मेन कॅमेराचे आहे विशेष आकर्षण**

# ओप्पो इंडियाने प्रीमियम रेनो१५ सिरीज केली लाँच




पुणे (दै. संध्या) : ओप्पो इंडियाने आज त्यांची प्रीमियम रेनो१५ सिरीज लाँच केली, त्यामध्ये रेनो१५ प्रो, रेनो१५ प्रो मिनी आणि रेनो१५ ही तीन प्रकारची विशेष आकर्षणे आहेत. तरुण प्रवासी आणि उत्साही फोटोग्राफरसाठी तयार केलेल्या या सिरीजमध्ये प्रगत कॅमेरा सिस्टम, बुद्धिमान एआय आणि अचूक डिझाइनचे मिश्रण आहे. नैसर्गिक घटकांनी प्रेरित रंगीत फिनिश आणि अशा प्रकारच्या पहिल्या प्रकारच्या होलोफ्यूजन तंत्रज्ञानासह, रेनो१५ सिरीजमध्ये कॉम्पॅक्ट, एर्गोनॉमिक फॉर्म फॅक्टर आणि दणकट बिल्ड क्वालिटी आहे. रेनो१५ प्रो आणि रेनो१५ प्रो मिनी २०० एमपी कॅमेरासह फोटोग्राफीला पुढे जात असून त्यामध्ये स्तंभित करणारी क्लॅरिटी आहे. त्याच्या जोडीला ५० एमपी ३.५ एक्स ऑप्टिकल झूम लेन्स, १२० एक्स पर्यंत डिजिटल झूम, प्युरटोन इमेजिंग टेक्नॉलॉजी आणि एआय एडिटिंग टूल्सही आहेत.

रेनो१५ सिरीजच्या लाँचबद्दल बोलताना ओप्पो इंडियाचे कम्युनिकेशन्स प्रमुख गोल्डी पटनायक म्हणाले, "भारतात १० कोटींपेक्षा अधिक ओप्पो वापरकर्ते आहेत, त्यामुळे ग्राहकांच्या अपेक्षा प्रीमियम अनुभवांच्या दिशेने, विशेषतः कॅमेरा सिस्टम, अंतर्ज्ञानी एआय, विशिष्ट डिझाइन भाषा आणि वापरकर्ता अनुभवाच्या दिशेने, कशा विकसित झाल्या आहेत हे आम्ही जवळून अनुभवले आहे. रेनो सिरीजची सातत्यपूर्ण वाढ ही या ट्रेंडसाठी आमची कटिबद्धता आहे कारण ग्राहक किरकोळ अपग्रेडपेक्षा वास्तव जगातील मूल्य देणारी उपकरणांच्या शोधात आहेत. रेनो१५ सिरीजद्वारे आम्ही त्या विश्वासावर उभारी घेत असून लक्षणीयरीत्या प्रगत इमेजिंग सिस्टम, सखोल एआय क्षमता आणि मजबूत अष्टपैलू कामगिरी देत आहोत. तरुण भारतीय कसे प्रवास करतात, त्यांचे क्षण कसे तयार करतात आणि कॅप्चर करतात यानुसार त्यांची रचना करण्यात आली आहे."

**अखंड सर्जनशीलतेसह सिनेमॅटिक ४के व्हिडिओ**

सतत फिरतीवर असताना शूटिंग करणाऱ्या क्रिएटर्ससाठी ओप्पो रेनो१५ प्रो ५जी आणि ओप्पो रेनो १५ प्रो मिनी ५जी हे फ्रंट, मेन, अल्ट्रा-वाइड आणि टेलिफोटो कॅमेऱ्यांमध्ये ६०एफपीएस पर्यंत ४ के एचडीआर व्हिडिओ रेकॉर्डिंगला सपोर्ट करतात. एचडीआर रेकॉर्डिंग हायलाइट्स आणि शॅडो दोन्हीमध्ये तपशील जतन करते, विविध प्रकाश परिस्थितींमध्ये नैसर्गिक रंग आणि संतुलित कॉन्ट्रास्टसह फुटेज प्रदान करते. सर्व फोकल लेंथसह ४के ६०एफपीएस एचडीआर सह, रेनो १५ प्रो सीरीजमुळे क्रिएटर्सना अधिक सर्जन आणि संपादनाच्या लवचिकतेची मुभा मिळते. क्रिएटर्स सातत्यपूर्ण रिझोल्यूशन, फ्रेम रेट आणि डायनॅमिक रेंजसह वाइड शॉट्स आणि क्लोज-अप दरम्यान सहजपणे स्विच करू शकतात किंवा एकाच क्षणात अनेक कोन कॅप्चर करू शकतात. यामुळे रंग, एक्सपोजर किंवा मोशनमध्ये अचानक बदल न होता सुरळीत एडिटिंग आणि दृश्य सातत्याची सुनिश्चिती होते. यामुळे जलद-वेगवान शूटिंग आणि पोस्ट-प्रोडक्शन वर्कफ्लोसाठी ती आदर्श ठरते.

रेनो१५ प्रो हा समुद्राला द्रवरूप सोन्याच्या चादरीत बदलणाऱ्या सूर्यास्ताच्या वेळेसच्या समुद्रकिनाऱ्यांच्या सोनेरी रंगछटांनी प्रेरित अशा सनसेट गोल्ड रंगात आणि चहा व कॉफीच्या उबदारतेमध्ये मूळ असलेल्या कोको ब्राउन रंगात येतो. रेनो१५ प्रो मिनीमध्ये कोको ब्राउन रंग कायम आहे. त्यात होलोफ्यूजन तंत्रज्ञान आणि क्रिस्टल पिंक प्रकाराद्वारे साध्य केलेला त्रिमितीय रिबन पॅटर्न हे खास आकर्षण असलेला ग्लेशियर व्हाइट रंग आणि आणि क्रिस्टल पिंक प्रकाराची भर पडली आहे. रात्रीचे आकाश आणि ऑरोरासारख्या घटनांमधून प्रेरणा घेतलेल्या ग्लेशियर व्हाइट, ट्रायलाइट ब्लू आणि ऑरोरा ब्लूसह रेनो१५ची लाईनअप पूर्ण होती.

रेनो१५ प्रो च्या १२ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटची किंमत ६७,९९९ रुपये आणि १२ जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंटची किंमत ७२,९९९ रुपये आहे. रेनो१५ प्रो मिनी १२ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटची किंमत ५९,९९९ रुपये आणि १२जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंटची किंमत ६४,९९९ रुपये आहे. दरम्यान, रेनो१५ तीन कॉन्फिगरेशनमध्ये उपलब्ध आहे, ८ जीबी + २५६ जीबी ४५,९९९ रुपये, १२ जीबी + २५६ जीबी ४८,९९९ रुपये आणि १२ जीबी + ५१२ जीबी ५३,९९९ रुपये.

ओप्पो रेनो१५ सीरीज ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मेनलाईन रिटेल आऊटलेट्स आणि ओप्पो ई-स्टोरमध्ये आकर्षक ऑफर्ससह खरेदीसाठी उपलब्ध असेल.

- निवडक बँक भागीदारांसह क्रेडिट कार्डवर आणि यूपीआय व्यवहारांवर १० टक्के पर्यंत इन्स्टंट कॅशबॅक* मिळवा.
- सर्व आघाडीच्या फायनान्सर्सकडून १५ महिन्यांपर्यंत शून्य डाउन पेमेंट योजनांचा लाभ घ्या.
- आघाडीच्या ट्रेड इन पार्टनर्ससह २ हजार रुपयांचा एक्सचेंज बोनस मिळवा
- कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय १८० दिवसांचे स्क्रीन डॅमेज प्रोटेक्शन मिळवा.
- १ वर्षाची विस्तारित वॉरंटी
- प्रत्येक रेनो १५ मालिकेच्या खरेदीवर ओप्पो एन्को बड्स ३ प्रो+वर ५० टक्के सूट मिळवा

रेनो १५ सी हा ८ जीबी + २५६ जीबी मध्ये ३४,९९९ रुपयांना आणि १२ जीबी + २५६ जीबी मध्ये ३७,९९९ रुपयांना उपलब्ध आहे.

आजच्या लाँचमध्ये, ओप्पोने ओप्पो पॅड ५ आणि ओप्पो एन्को बड्स ३ प्रो+ या दोन नवीन इकोसिस्टम उत्पादनांची घोषणा केली.

ओप्पो पॅड ५ मध्ये परावर्तन (रिफ्लेक्शन) कमी करतानाच तीक्ष्ण दृश्ये देणारा मोठा १२.१-इंचाचा २.८ के अँटी-ग्लेअर मॅट डिस्प्ले आहे. त्यामुळे तो दीर्घ वाचन आणि पाहण्यासाठी आरामदायी ठरतो. विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी बनवलेल्या हा टॅबलेटमध्ये एआय-संचालित नोट-टेकिंगची सुविधा आहे, त्यामुळे सुटसुटीतपणा सोपी होते आणि उत्पादकता वाढते. याच्या १०,०५० एमएएच ची विशाल बॅटरीमुळे वारंवार चार्जिंगशिवाय काम, शिक्षण आणि मनोरंजनासाठी दीर्घकाळ वापर सुनिश्चित होते. ओप्पो पॅड ५ हा दोन स्टोरेज प्रकारांमध्ये उपलब्ध असेल, ८ जीबी + १२८ जीबी मॉडेलसाठी रुपये २६,९९९ आणि ८ जीबी + २५६ जीबी ५जी प्रकारासाठी रुपये ३२,९९९.

# ‘भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन’ या चित्रपटाचा धमाल ट्रेलर!

मुंबई (दै. संध्या) :




भारतातील सर्वात लोकप्रिय टेलिव्हिजन कॉमेडी आता मनोरंजनाचा स्तर आणखी उंचावण्यासाठी सिद्ध झाली आहे आणि ती ही थेट मोठ्या पडद्यावर. तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ प्रेक्षकांचे मनोरंजन केल्यानंतर ‘भाभीजी घर पर हैं!’ ही मालिका आता आपल्या विश्वाचा विस्तार करत चित्रपटाच्या रूपात सादर होत आहे—‘भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन’. झी स्टुडिओज आणि एडिट II यांनी आज चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला असून तो प्रेक्षकांना नेमके जे अपेक्षित आहे तेच देण्याचे वचन देतो — न थांबणारी कॉमेडी, गोंधळ आणि धमाल मनोरंजनाचा पूर्ण डोस! ट्रेडमार्क विनोद, रंगतदार नाट्य आणि अतिशयोक्ती, मोठ्या पडद्याला साजेशा प्रसंगांनी भरलेला हा ट्रेलर प्रेक्षकांना एका झपाट्याने पुढे जाणाऱ्या, खळखळून हसवणाऱ्या सिनेमॅटिक प्रवासाची झलक दाखवतो. यात प्रेक्षकांच्या परिचयाची ही पात्रे पुन्हा एकदा अनपेक्षित आणि हास्यास्पद परिस्थितींमध्ये अडकताना दिसतात. झी सिनेमा, संजय कोहली आणि बिनैफर कोहली यांची निर्मिती आणि शशांक बाली यांचे दिग्दर्शन असलेला हा चित्रपट झी स्टुडिओज् 6 फेब्रुवारी 2026 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित करणार आहे.

आपल्या मूळ आयकॉनिक शोच्या आत्म्याशी एकरूप राहत पण सिनेमासाठी त्याचा आवाका वाढवत ‘भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन’ हा चित्रपट भारतीय पॉप कल्चरचा भाग बनलेल्या या प्रेक्षकप्रिय पात्रांना पुन्हा एकत्र आणतो. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये रोमान्स, गोंधळ, ॲक्शन, नवीन खलनायक आणि दुप्पट धमाल यांची झलक देत, हा चित्रपट मोठ्या पडद्यावर अनुभवावा असा थिएटर-फर्स्ट कॉमेडी स्पेक्टॅकल असल्याचे स्पष्ट होते.

शुभांगी अत्रे पुन्हा एकदा आयकॉनिक अंगूरी भाभीजींची भूमिका अगदी सहजतेने साकारते, तर विदिशा श्रीवास्तव त्यात अनीता भाभीजी म्हणून मोहकता आणि ग्लॅमरची भर घालते. आसिफ शेख नेहमीप्रमाणे मनोरंजन करणारे विभूतीजी म्हणून परत येतात तर रोहिताश गौर तिवारीजींच्या भूमिकेत हशा आणखी वाढवतात. रवि किशन, मुकेश तिवारी आणि निरहुआ यांच्या प्रवेशामुळे कथेत नवे ट्विस्ट, गोंधळ आणि या प्रेक्षकप्रिय विश्वात नव्या प्रकारची धमाल निर्माण होते.

शुभांगी अत्रे म्हणाली, “भाभीजीचे विश्व नेहमीच माझ्या मनाच्या खूप जवळ राहिले आहे आणि आता ते मोठ्या पडद्यावर चित्रपटाच्या रूपात साकारताना पाहणे खरोखरच अविश्वसनीय वाटत आहे. हा चित्रपट आम्ही फक्त 17 दिवसांत शूट केला आणि आम्ही सगळ्यांनी भरपूर मजा केली. यावेळी प्रेक्षकांना अंगुरीच्या खोड्यांचे नवे पैलू पाहायला मिळतील आणि अनेक सरप्राइझेसही अनुभवायला मिळतील. रवि किशन सर आणि मुकेश तिवारी सर यांच्यासोबत काम करणे हा शिकण्याचा एक उत्तम अनुभव होता आणि आम्हांला आशा आहे की आमच्या चाहत्यांना हा चित्रपट नक्कीच आवडेल.”

रवि किशन म्हणाले, “चित्रपटाची स्क्रिप्ट हातात येताच मी खूपच उत्साहित झालो कारण ही नेहमीसारखी कॉमेडी नव्हती हे मला लगेचच जाणवलं. भाभीजी घर पर हैं हा एक कल्ट शो आहे आणि त्याच्या चित्रपटाचा भाग होणे ही एक अप्रतिम अनुभूती होती. सेटवर सगळ्यांसोबत माझे उत्तम जमले. विशेष म्हणजे शुभांगीसोबत काम करताना खूप मजा आली, आम्ही अनेक सीन्स एकत्र केले आणि सेटवर अक्षरशः हसण्याचा गोंधळ असायचा. माझी व्यक्तिरेखा पूर्णपणे खलनायकी आहे आणि कथेत काही अनपेक्षित वळणे घेऊन येते.”

विदिशा श्रीवास्तव म्हणाली, “यावेळेस अनीता भाभीजीचा या गोंधळात खूप जास्त सहभाग आहे. केवळ ग्लॅमरपुरते तिचे पात्र मर्यादित नाही—ती कथेला मोठ्या प्रमाणावर पुढे नेते. त्यामुळे हा चित्रपट माझ्यासाठी प्रचंड उत्साहवर्धक ठरला आणि प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर अनीताच्या या नव्या रूपाचा आनंद नक्कीच मिळेल अशी आशा आहे.”

आसिफ शेख म्हणाले, “भाभीजीच्या विश्वासोबत मी दहा वर्षांहून अधिक काळापासून जोडलेला आहे आणि आता याला मोठ्या पडद्यावर चित्रपटाच्या रूपात साकारताना पाहताना मला खूप अभिमान आणि आनंद वाटत आहे. चित्रपटात विभूती स्वतःला अनेक आव्हानात्मक परिस्थितींमध्ये अडकलेला पाहतो आणि यामुळे मला माझ्या कॉमिक बाजूचा आणखी शोध घेण्याची संधी मिळाली. हा एक उत्तम अनुभव होता.”

रोहिताश गौर म्हणाले, “तिवारीजींची व्यक्तिरेखा गोंधळ आणि विनोदाच्या बाबतीत किती पुढे जाऊ शकते हे पाहून मलाच आश्चर्य वाटले. चित्रपटात तुम्हांला अतिशय नाट्यमय, विनोदी आणि गोंधळलेले तिवारीजी पाहायला मिळतील. ही भूमिका साकारताना मला खूप आनंद मिळाला. आमच्या विश्वावर आधारित असा स्वतःचा चित्रपट असणे ही एक अविश्वसनीय गोष्ट आहे आणि प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच आवडेल अशी आशा आहे.”

दिग्दर्शक शशांक बाली म्हणाले, “गेल्या अनेक वर्षांमध्ये ‘भाभीजी घर पर हैं’ ने आपल्या विनोदामुळे, जिव्हाळ्यामुळे आणि पात्रांमुळे विविध पिढ्यांतील प्रेक्षकांशी भावनिक नाते निर्माण केले आहे. चित्रपटात आमचा उद्देश चाहत्यांना प्रिय असलेला आत्मा आणि विनोद यांना जपून, मोठ्या पडद्यासाठी त्याचा आवाका वाढवण्याचा होता. ट्रेलरमधून प्रेक्षकांना चित्रपटाची भव्यता, गोंधळ आणि थिएटरमध्ये त्यांची वाट पाहणाऱ्या हशाची एक झलक दिसते.”

झी स्टुडिओजचे चीफ बिझनेस ऑफिसर उमेश कुमार बन्सल म्हणाले, “‘भाभीजी घर पर हैं!’ हा भारतातील सर्वात आवडता आणि सर्वाधिक काळ चालणाऱ्या टेलिव्हिजन कॉमेडी शोमध्ये एक असून, त्याला मोठ्या पडद्यावर आणणे हे या फ्रँचायजीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर या लोकप्रियतेच्या शोचे, तो अजूनही ऑन-एअर असताना, थिएटरसाठी रूपांतर होणे ही पहिलीच वेळ आहे. यावरून प्रेक्षकांना या पात्रांबद्दल असलेले प्रेम किती मोठे आहे हे स्पष्ट होते. ‘फन ऑन द रन’ द्वारे आम्ही चाहत्यांना खरोखरच सिनेमासाठीच घडवला गेलेला आणखी मोठा, समृद्ध आणि अधिक मनोरंजक अनुभव देण्याचा प्रयत्न करत आहोत.”

निर्माते संजय कोहली म्हणाले, “‘भाभीजी घर पर हैं!’ हा शो अनेक वर्षांपासून भारतीय घरांचा एक भाग राहिला आहे. हा अनुभव आता मोठ्या पडद्यावर आणणे आमच्यासाठी खूप खास क्षण आहे. हा चित्रपट शोच्या मूळ भावनेशी प्रामाणिक राहतो आणि प्रेक्षकांना आणखी मोठी, अधिक मनोरंजक सफर देतो. प्रेक्षकांनी हा अनुभव थिएटरमध्ये मोठ्या पडद्यावर घ्यावा यासाठी आम्ही उत्सुक आहोत.”

काय होतं जेव्हा सगळं काही एकत्र धडकतं? चुका, गोंधळ आणि नॉन-स्टॉप मजा असलेली धमाल कॉमेडी. हा हास्यधमाका मोठ्या स्क्रीनवर अनुभवण्यासाठी सज्ज व्हा, ‘भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन’ मोठ्या पडद्यावर 6 फेब्रुवारी 2026 रोजी!

## थोडक्यात पण महत्वाचे...

### 'अरुधा हायब्रिड लॉन्ग-शॉर्ट फंड' सुरु

पुणे (दैनिक संध्या) : बंधन म्युच्युअल फंडाच्या अरुधा एसआयएफने आपली पहिली एसआयएफ स्ट्रॅटेजी 'अरुधा हायब्रिड लॉन्ग-शॉर्ट फंड' सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही एक इंटरव्हल इन्व्हेस्टमेंट स्ट्रॅटेजी असून, जोखीम व्यवस्थापनासोबत करानंतर चांगले परतावे देणे, हा तिचा मुख्य उद्देश आहे. या स्ट्रॅटेजीअंतर्गत अल्प ते मध्यम कालावधीच्या डेट आणि मनी मार्केट इन्स्ट्रुमेंट्समध्ये ६५ टक्क्यांपर्यंत गुंतवणूक करण्याचा मानस आहे. तर पूर्णपणे हेज्ड, मार्केट-न्यूट्रल इक्विटी पोझिशनमध्ये किमान ३५ टक्के वाटा राखला जाणार आहे. स्ट्रॅटेजी डॉक्युमेंटनुसार, या योजनेत डेट व मनी मार्केट इन्स्ट्रुमेंट्स तसेच इक्विटी इन्स्ट्रुमेंट्समध्ये किमान ३५ टक्के आणि कमाल ६५ टक्के गुंतवणूक करता येईल. तसेच २५ टक्क्यांपर्यंत शॉर्ट, अनहेज्ड डेरिव्हेटिव्ह्ज एक्सपोजर घेण्याची मुभा आहे. या स्ट्रॅटेजीतील डेट एक्सपोजर एक ते चार वर्षांच्या कालावधीत ॲक्टिव्ह ड्युरेशन मॅनेजमेंट असलेल्या इन्स्ट्रुमेंट्समध्ये असेल. एए+/एए रेटिंग असलेल्या इन्स्ट्रुमेंट्समध्ये गुंतवणूक करता येईल, मात्र ती एकूण पोर्टफोलिओच्या १० टक्क्यांपर्यंत मर्यादित असेल. उर्वरित गुंतवणूक एएए-रेटेड किंवा सॉव्हरिन सिक्युरिटीजमध्ये केली जाईल. या डेट वाटपाचा उद्देश स्थैर्य, तरलता आणि एक्रुअल उत्पन्न उपलब्ध करून देणे हा आहे.

### रणबीर कपूर सोबत पीएनजी ज्वेलर्स'चा ‘परंपरा आणि आधुनिकतेचा नवा अध्याय सुरु

पुणे (दैनिक संध्या) : १८३२ पासूनचा समृद्ध वारसा जपणारा भारतातील एक अग्रगण्य दागिन्यांचा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'ने बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर याची नवा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. परंपरेची जाण, आकर्षकता आणि विश्वासार्हता यांचा सहज संगम असलेला रणबीर कपूर 'पीएनजी ज्वेलर्स'च्या प्रवासातील एक रोमांचक नवा अध्याय ठरणार असून, यामुळे ब्रँडची राष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती अधिक भक्कम करणार आहे. महाराष्ट्राच्या मातीतून सुरू झालेले आणि आज भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर आत्मविश्वासाने विस्तार करत असलेले 'पीएनजी ज्वेलर्स' डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. रणबीर कपूरसोबतची ही भागीदारी ब्रँडच्या उत्क्रांतीचे प्रतीक असून, विश्वास, कारागिरी आणि वारसा या मूल्यांशी असलेली नाळ अधिक दृढ करते.

## पाच वर्षाच्या चिमुकल्याला सोसायटीच्या परिसरातच कारने चिरडले

नवी दिल्ली (दै. संध्या) :

सोसायटीच्या परिसरात सायकल खेळत असलेल्या एका पाच वर्षाच्या मुलाचा कार खाली चिरडून मृत्यू झाला. काळजाचा थरकाप उडवणारी ही सगळी घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली. पुण्यातील लोणी काळभोर भागात हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, निष्कर्ष आश्वत स्वामी (वय ५ वर्षे) असे कारच्या धडकेत मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. निष्कर्षचे वडील आश्वत नारायण स्वामी (वय ४० वर्षे) हे लोणी काळभोर येथील जॉय नेस्ट सोसायटीमध्ये राहतात. त्यांनी या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी कार चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आश्वत स्वामी यांचा मुलगा निष्कर्ष याला घेऊन त्यांची सासू सरस्वती रेड्डी या सोमवारी (१९ जानेवारी) दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास सोसायटीच्या आवारात आल्या होत्या. सोसायटीच्या आवारात निष्कर्ष खेळत होता. त्यावेळी सोसायटीच्या आवारातच वेगात आलेल्या कारने त्याला उडवले. बराच दूर गेल्यानंतर चालकाने कार थांबवली तोपर्यंत मुलगा फरफटत गेला.

## कृषिक कृषी प्रदर्शनास शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद

### आधुनिक, किफायतशीर व शाश्वत शेतीच्या दिशेने मार्गदर्शन करणारे पहिले कृषी प्रदर्शन-राजेंद्र पवार

बारामती (दै. संध्या) :



गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्र बारामतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनास शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला.आज परभणी, अकोला,लातूर,बुलढाणा, सोलापूर,कोल्हापूर येथील जिल्ह्यांमधून येथील शेतकऱ्यांनी प्रदर्शन स्थळी गर्दी केली होती.

प्रदर्शन ८ दिवसांचे केले असताना सुद्धा शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत आहेत. ट्रस्टचे चेअरमन मा.श्री.राजेंद्र दादा पवार,मुख्य कार्यकारी अधिकारी प्रो. निलेश नलावडे स्वतः शेतक-यांच्या सूचना, आवडलेले विषय,अडचणी जाणून घेत होते. विशेष करून AI च्या ऊस व भाजीपाला प्लॉटला शेतकरी जास्त माहिती घेत होते.तसेच पशु प्रदर्शनामध्ये कोंबड्या, विविध जातीच्या गाई, म्हैस,शेळ्या इ.माहिती शेतकरी घेत होते.

आज बारामती येथून सायकल स्पर्धेचा मार्ग असल्याने प्रदर्शन ठिकाणी येण्याचे मार्ग दुपारी काही वेळ बंद असल्याने प्रदर्शन १ तास उशीर पर्यंत चालू ठेवले होते.

हे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांना आधुनिक, किफायतशीर व शाश्वत शेतीच्या दिशेने मार्गदर्शन करणारे ठरत आहे.सदर कृषी प्रदर्शन शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

## आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप २०२६चा रोमहर्षक अनुभव देणार



पुणे (दै. संध्या) :

मॅरियट बोनव्हाय हा मॅरियट इंटरनॅशनलचा पुरस्कार-प्राप्त ट्रॅव्हल प्लॅटफॉर्म यंदा फेब्रुवारीमध्ये सदस्यांना क्रिकेटचा आनंद देणार आहे, ज्यासह त्यांना आगामी आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप 2026चा रोमहर्षक अनुभव मिळेल. मॅरियट बोनव्हायच्या इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिल (आयसीसी) सोबत जागतिक सहयोगाचा भाग म्हणून सदस्य विशेषतः भारतात व श्रीलंकेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या इव्हेण्टसाठी डिझाइन करण्यात आलेल्या 500 हून अधिक सर्वोत्तम मॅरियट बोनव्हाय मोमेण्ट्सचा आनंद घेऊ शकतात.

दोन भाग्यवान सदस्यांना मॅरियट बोनव्हाय गोल्डन तिकिटासह अद्वितीय अनुभव मिळेल, जेथे दोन व्यक्तींना स्टाइलमध्ये आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप 2026 फायनल्स पाहण्याची सुवर्णसंधी मिळेल. एक गोल्डन तिकिट मॅरियट बोनव्हाय पॉइण्ट्ससह सर्वाधिक बोली लावणाऱ्या सदस्याला देण्यात येईल, तर दुसरे गोल्डन तिकिट जागतिक मॅरियट बोनव्हाय स्वीपस्टेकच्या विजेत्याला मिळेल. सदस्य नसलेले मोफतपणे सदस्य बनण्यासाठी साइन अप करू शकतात आणि येथे (here) मॅरियट बोनव्हाय गोल्डन तिकिट जिंकण्याची संधी मिळवू शकतात.

सदस्य त्यांच्या मॅरियट बोनव्हाय पॉइण्ट्सचा वापर करत 500 हून अधिक मॅरियट बोनव्हाय मोमेण्ट्ससाठी बोली लावू शकतात किंवा पॉइण्ट्स रिडिम करू शकतात. यामध्ये मॅचडे मॅरियट बोनव्हाय हॉस्पिटॅलिटी एक्स्पीरिअन्सेस, सामन्यापूर्वी बियॉण्ड द बाउंड्री एक्स्पीरिअन्सेस किंवा मॅरियट बोनव्हाय ॲन्थेम किड्स एक्स्पीरिअन्सेस यांचा समावेश आहे, जेथे ते त्यांच्या मुलांसोबत संस्मरणीय आठवणी निर्माण करू शकतात, राष्ट्रगीतादरम्यान खेळाडूंसोबत मैदानावर जाऊ शकतात. आजपासून, मॅरियट बोनव्हाय मोमेण्ट्स जगभरातील सदस्यांना ऑनलाइन येथे उपलब्ध असतील. प्लॅटफॉर्मवर नियमितपणे नवीन अनुभव लाँच करण्यात येतील, यामध्ये भारत व पाकिस्तान यांच्यामधील बहुप्रतिक्षित सामन्याकरिता सामान्य प्रवेश तिकिटांचा समावेश असलेल्या 1-पॉइण्ट ड्रॉप्सचा समावेश आहे. दहा 1-पॉइण्ट ड्रॉप्स मिळवण्याची संधी आहे, जे 2 फेब्रुवारी 2026 राजी सिंगल मॅरियट बोनव्हॉय पॉइण्टसाठी रिडिम करता येऊ शकतात.

मॅरियट बोनव्हाय व्यक्तींना आवडणाऱ्या गोष्टींच्या, प्रेरित करणाऱ्या ठिकाणांच्या जवळ नेते, तसेच महत्त्वपूर्ण क्षणांचा आनंद देते. आयसीसीसोबत आमच्या जागतिक सहयोगाच्या माध्यमातून आम्ही अत्यंत संस्मरणीय पद्धतीने आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप 2026 चा रोमहर्षक अनुभव देण्यास सज्ज आहोत. पुढील रांगेमधील सीट्स व पडद्यामागील घडामोडींपासून प्रीमियम आदरातिथ्य, पालक व मुलांमधील उत्साहवर्धक अनुभव आणि आमच्या मॅरियट बोनव्हाय हॉटेल्सच्या पोर्टफोलिओमधील स्टेपर्यंत आम्ही संस्मरणीय आठवणी निर्माण करत आहोत, ज्या या वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्यानंतर देखील कायम राहतील, असे मॅरियट इंटरनॅशनलचे चीन वगळता आशिया पॅसिफिकमधील चीफ कमर्शियल ऑफिसर जॉन टूमी म्हणाले.

# लोम्बार्ड अभियंत्यांना प्रशिक्षण



पुणे (दै. संध्या) :

सध्या सुरू असलेल्या झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉर (ZFC) उपक्रमांतर्गत, सेव्हलाइफ फाउंडेशनने २० जानेवारी २०२६ रोजी मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अभियंते प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली. या उपक्रमाचा उद्देश उच्च-जोखीम असलेल्या रस्ते कॉरिडॉरमध्ये सुरक्षा पद्धती मजबूत करून टाळता येण्याजोग्या रस्ते अपघातातील मृत्यू कमी करणे आहे.

आयसीआयसीआय लोम्बार्डच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) कार्यक्रमांतर्गत समर्थित, प्रशिक्षणात सुरक्षित रस्ते कार्यस्थळ व्यवस्थापनाचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलू समाविष्ट होते, ज्याचा उद्देश सक्रिय बांधकाम क्षेत्रांमध्ये सुरक्षा मानके सुधारणे आणि अपघाताचे धोके कमी करणे हा होता. या कार्यक्रमाला एमएसआरडीसीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती शैलजा पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमात बोलताना त्या म्हणाल्या, "रस्ता सुरक्षा व्यवस्थापनात प्रत्यक्ष कृती अत्यंत महत्त्वाची आहे. एक्सप्रेसवेवर बसवलेल्या एसओएस सिस्टीम व्यतिरिक्त, अपघातग्रस्तांना मूलभूत वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी प्रथमोपचार पेट्या सुरू करण्याचा मी प्रस्ताव ठेवतो, ज्यामुळे अपघातांचे परिणाम कमी होतील."

९४.५ किमी लांबीचा, मुंबई-पुणे एक्सप्रेसवे हा भारतातील पहिला ६-लेन महामार्ग आहे, जो संपूर्ण राज्यात कनेक्टिव्हिटी आणि आर्थिक विकास सुधारतो.२०१६ मध्ये, जेव्हा सेव्हलाइफ फाउंडेशनने त्यांच्या झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉर (ZFC) उपक्रमांतर्गत या कॉरिडॉरवर काम सुरू केले तेव्हापासून ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत, रस्ते अपघातातील मृतांमध्ये ५८% घट झाली. अलीकडेच, महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने शेअर केलेल्या आकडेवारीनुसार, एक्सप्रेसवेने जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान एकूण रस्ते अपघातातील मृतांमध्ये २६% घट नोंदवली आहे - २०२४ मध्ये याच कालावधीत ८२ मृत्यूंवरून या वर्षी ६१ पर्यंत.

याव्यतिरिक्त, देखभाल आणि बांधकाम उपक्रमांदरम्यान वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षित कार्य क्षेत्रे स्थापित करण्यावरील मॉड्यूल देखील सत्राचा एक भाग होते.

**प्रशिक्षणातील प्रमुख क्षेत्रांमध्ये हे समाविष्ट होते**

- अपघाताचे धोके कमी करण्यासाठी कार्यक्षेत्रांचे नियोजन आणि व्यवस्थापन
- वाहतूक व्यवस्थापन योजना, अडथळे आणि सूचना फलकांचा प्रभावी वापर
- केस स्टडीज सुरक्षित वळसा पद्धती आणि घटना प्रतिबंध
- सुरक्षित ऑन-ग्राउंड पद्धतींवर परस्परसंवादी सत्रे
- कार्यक्षेत्र व्यवस्थापनातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींवर चर्चा


## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. २३/०१/२०२६ ते दि. ३०/०१/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. २३/०१/२०२६ ते दि. ३०/०१/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत

जाहिरात क्र. १/३१६ दि. २३/०६/२०२५
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : ०२/०२/२०२६ १५.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2025/381 | विद्युत | पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत मिटी लायब्ररी येथे विद्युत व प्रकाश व्यवस्था कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ६३१४९८९/- | रू. ६३१४९/- | ६ | मंगल मारतळेकर ७४४७४७२४१२ |
| PMC/ELECTRICAL/ 2025/382 | विद्युत | पुणे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील विविध मैलापाणी शुद्धीकरण केंद्र येथे निर्जंतुकीकरण करणेसाठी वापरण्यात येणाऱ्या क्लोरीन डायऑक्सइड (CLO2) पावडरचा आवश्यकेनुमार पुरवठा करणे. | रू. ६०७९/- | रू. ८२५००००/- | रू. ८२५००/- | ८ | सोमनाथ आवळे ९६८९९३१६९४ |
| PMC/ELECTRICAL/ 2025/383 | विद्युत | बाणेर नॅशनल हायवे लगत हॉटेल सदानंद ते ननवरे ब्रिजपर्यंत १८ मी. डी. पी. रस्ता विकसनातील एम. एम. ई. बी. चे पोल शिफ्ट करून अंडरग्राउंड केबल टाकणे. | रू. १३५९/- | रू. ४२३७१८५/- | रू. ४२३७२/- | १० | प्रल्हाद ताराचंद पवार ९६८९९३७६९७ |
| PMC/ELECTRICAL/ 2025/384 | विद्युत | गणेश कला क्रीडा रंगमंच येथे जनरेटर पॅनल, स्टेज जवळील पॅनल, कलादलनातिल पॅनल येथिल तदनुषगिक विद्युत विषयक कामे करणे. | रू. १३५९/- | रू. २५१८३५०/- | रू. २५१८४/- | ६ | Bhagyashree Uday Deshpande ९६८९९३६५४० |
| PMC/ELECTRICAL/ 2025/385 | विद्युत | पुणे महानगरपालिकेच्या बाणेर मैलापाणी शुद्धीकरण केंद्र येथील प्रायमरी फाईन स्क्रीन पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. | रू. ६०७९/- | रू. ६९०४५६४/- | रू. ६९०४६/- | ६ | प्रल्हाद ताराचंद पवार ९६८९९३७६९७ |
| PMC/ELECTRICAL/ 2025/386 | विद्युत | शिवसेना प्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे नाट्यगृह येथील LT पॅनल AMF पॅनल इत्यादी विद्युत विषय कामे करणे. | रू. १३५९/- | रू. २६७५१७६/- | रू. २६७५२/- | ८ | Sushma ७२४९५९१७८२ |
| PMC/ELECTRICAL/ 2025/387 | विद्युत | शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे नाट्यगृह येथील उर्वरित विद्युत विषय कामे करणे. | रू. १३५९/- | रू. २९६२९३४/- | रू. २९६२९/- | ८ | Sushma ७२४९५९१७८२ |
| PMC/ELECTRICAL/ 2025/388 | विद्युत | CIIIT प्रशिक्षण केंद्र, पॅनकार्ड क्लब रोड, बाणेर येथे विद्युत विषयक कामे करणे. | रू. १३५९/- | रू. ३०३०७८६/- | रू. ३०३०८/- | ९ | प्रल्हाद ताराचंद पवार ९६८९९३७६९७ |
| PMC/ELECTRICAL/ 2025/389 | विद्युत | पुणे महानगरपालिकेचे बावधन येथे असलेले प्राण्यांचे इन्सिनेटर बोपोडी stp परिसरात स्थलांतरित करणे | रू. १३५९/- | रू. ३३३१४५८/- | रू. ३३३१५/- | ८ | मंगेश मिसाळ ९६८९९८७४४७ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Yogesh Mali
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/१५७० दि. २२/०१/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे...

### कंत्राटदारावर चाकूने वार

**पिंपरी :** चिंबळी येथे सुरू असलेले ग्रामपंचायतीच्या ड्रेनेजचे काम दोन जणांनी चाकूचा धाक दाखवून बंद पाडले. त्याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या कंत्राटदारावर चाकूने वार केल्याची घटना सोमवार (१९ जानेवारी) सायंकाळी चिंबळी येथील बर्गे वस्ती भागात घडली. याबाबत ३२ वर्षीय तरुणाने आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी जेसीबी चालवण्यासाठी घेतला आहे. जेसीबीचा चालक जेसीबीच्या साहाय्याने ग्रामपंचायतचे ड्रेनेजचे काम करत होता. त्यावेळी आरोपी तिथे आले. त्यांनी काम बंद पाडले. जेसीबी चालकाला चाकूचा धाक दाखवला. याबाबत फिर्यादी हे आरोपींना जाब विचारण्यासाठी गेले असता आरोपींनी फिर्यादी यांना मारहाण करून त्यांच्यावर चाकूने वार करत जखमी केले. आळंदी पोलीस तपास करत आहेत.

### टेम्पोची दुचाकीला धडक; चालक फरार

**पिंपरी :** बावधन येथील सातारा-मुंबई महामार्गावरील सेवा रस्त्यावर एका भरधाव पिकअप चालकाने दुचाकीला समोरून धडक देऊन दोन जणांना गंभीर जखमी केले. ही घटना मंगळवारी (२० जानेवारी) सकाळी घडली. यामध्ये दोघेजण जखमी झाले असून पिकअप चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचा भाऊ हे दुचाकीवरून कामावर जात असताना समोरून आलेल्या पिकअप चालकाने त्यांना जोरदार धडक दिली. यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले. तसेच त्यांच्या दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर चालक जखमींना मदत न करता वाहन घेऊन घटनास्थळावरून पळून गेला. बावधन पोलीस तपास करत आहेत.

### गावठी कट्ट्यासह तरुणाला अटक

**खेड :** खेड तालुक्यातील निघोजे गावच्या हद्दीत महींद्रा सर्कल जवळ पोलिसांनी कारवाई करत एका तरुणाला बेकायदेशीररीत्या देशी बनावटीचा गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस बाळगल्या प्रकरणी अटक केली. ही कारवाई सोमवारी (१९ जानेवारी) रात्री करण्यात आली. जव्हारसिंग गिलू केबट (२८, भांबोली, मूळ गाव – मध्य प्रदेश) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पोलीस शिपाई राजेश गिरी यांनी दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यातील पथकाने संशयावरून आरोपीची झडती घेतली असता, त्याच्याकडे ३० हजार रुपये किंमतीचा एक गावठी कट्टा आणि एक जिवंत पितळी काडतूस मिळून आले. त्यावरून त्याला अटक करण्यात आली आहे. दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

### जुगार अड्ड्यावर छापा; पाच जणांवर गुन्हा

**कुरुळी :** येथील चिंबळी फाटा परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून पाच जणांविरुद्ध कारवाई केली आहे. ही कारवाई मंगळवारी (२० जानेवारी) सायंकाळी करण्यात आली. याप्रकरणी पोलीस शिपाई राजेश गिरी यांनी दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चिंबळी फाटा येथे लोकांकडून पैसे घेऊन जुगार खेळत आणि खेळवत होते. या छाप्यात पोलिसांनी ४,४८० रुपये रोख आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

### आंबी गावात दारू भट्टीवर कारवाई

**मावळ :** तालुक्यातील आंबी गावच्या परिसरात पोलिसांनी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकून मोठ्या प्रमाणावर रसायने जप्त केली आहेत. ही घटना मंगळवारी (२० जानेवारी) सायंकाळी करण्यात आली. याबाबत अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस शिपाई सदानंद रुद्राक्ष यांनी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलांनी आंबी येथे दारू तयार करण्यासाठी भट्टी उभारली होती.

# 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर'निमित्त मध्यभागातील वाहतुकीत उद्या बदल

## शहरातील सर्व शाळा दुपारी बारापर्यंत सुरू ठेवण्याचे आदेश

**पिंपरी (दै. संध्या) :**

**पुणे : 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर' सायकल स्पर्धेचा समारोप शुक्रवारी (२३ जानेवारी) होणार आहे. शेवटच्या टप्यात शहराच्या मध्यभागातील प्रमुख रस्त्यावर वाहतूक बदल करण्यात आले आहेत. 'पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व सरकारी, तसेच खासगी शाळा शुक्रवारी दुपारी बारापर्यंत सुरु ठेवाव्यात. त्यानंतर शाळा बंद ठेवण्यात येणार आहेत' असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.**



'पुणे ग्रँड चॅलेंज टूर' सायकल स्पर्धेमुळे शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे. परदेशातील सायकलपटू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. नागरिकांनी स्पर्धेकांना उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे.
**– रंजनकुमार शर्मा,** सहपोलीस आयुक्त, पुणे



'या स्पर्धेच्या अखेरच्या टप्प्यात शुक्रवारी ९९ किलोमीटर मार्गावर ही शर्यत होणार आहे. बालेवाडीतील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल येथून स्पर्धेचा प्रारंभ होणार आहे. तेथून पाषाणमार्गे एनसीएल चौक, रक्षक चौक, काळेवाडी फाटा, डांगे चौक, संत तुकाराम महाराज पूल, भक्ती शक्ती चौक, त्रिवेणीनगर, तापकीर चौक, काळेवाडी फाटा, आचार्य आनंदऋषीजी चौक (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक) सेनापती बापट रस्ता, बालभारती, नळस्टॉप, लक्ष्मीनारायण चौक, शंकरशेठ रस्त्यावरील ढोले-पाटील चौक (सेव्हन लव्हज चौक), लष्कर परिसर टर्फ क्लब, साधू वासवानी चौक, साखर संकुल हा मार्ग स्पर्धेसाठी निश्चित करण्यात आला आहे. जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी चौक येथे स्पर्धेचा समारोप होणार आहे', अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

बालेवाडीतील राधा चौक ते सुस खिंड रोड , पूनम बेकरी ते पाषाण चौक, पाषाण ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राजीव गांधी पूल, सेनापती बापट रस्ता, पत्रकार भवन ते विधी महाविद्यालय रस्ता, नळस्टॉप ते सेनादत्त पेठ, टिळक चौक ते अप्पा बळवंत चौक, दगडूशेठ हलवाई ते मंडई, छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील राष्ट्रभूषण चौक ते ना. सी. फडके चौक, नरपतगिरी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक, लष्कर भागातील अर्जुन चौक ते घोरपडी परिसर, लाल महाल चौक ते स. गो. बर्वे चौक (मॉडर्न कॅफे), गरवारे चौक ते जंगली महाराज रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे.

**अर्ध्या तासाहून जास्त वेळ रस्ते बंद नाहीत**

'सायकल स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी दुपारी बारा ते चार दरम्यान करण्यात आले आहे. स्पर्धेचा मार्ग टप्याटप्याने बंद करण्यात येणार आहे. कोणताही रस्ता अर्ध्या तासांहून जास्त वेळ बंद ठेवण्यात येणार नाही. स्पर्धेच्या मार्गावर दुतर्फा वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी चौक येथे स्पर्धेचा समारोप होणार आहे.

स्पर्धेच्या काळात शहरात जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहेत. वाहनचालकांनी पोलिसांना सहकार्य करावे, तसेच पर्यायी मार्गांचा वापर करावा. रुग्णवाहिकांना त्वरीत मार्ग उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. स्पर्धा मार्गस्थ झाल्यानंतर पाठीमागील रस्ते वाहतुकीस खुले करुन दिले जातील', असे आवाहन अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी केले आहे.

# भाजपला ४५.२०, अजितदादांच्या 'राष्ट्रवादी'ला ३६.३७ टक्के मते;

## एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला 'नोटा'पेक्षा कमी मते

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला ४५.२० टक्के मतदारांनी पसंती दिली. त्याखालोखाल राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला ३६.३७ टक्के मतदान झाले आहे. सहा नगरसेवक निवडून आलेल्या शिवसेना (शिंदे) पक्षाला 'नोटा'पेक्षा कमी मते मिळाली आहेत. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवरून ही माहिती समोर आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात १७ लाख १३ हजार ८९१ मतदार आहेत. यामध्ये नऊ लाख पाच हजार ७२८ पुरूष, आठ लाख ७९ हजार ६६ महिला तर १९७ इतर मतदार आहेत. त्यापैकी महापालिका निवडणुकीत पाच लाख २५ हजार १४७ पुरूष, चार लाख ६३ हजार





८२७ महिला आणि ५२ इतर अशा नऊ लाख ८९ हजार २६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. याची टक्केवारी ५७.७१ एवढी होत आहे. मतमोजणीनंतर भाजपचे सर्वाधिक ८४, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे ३७, शिवसेना (शिंदे) पक्षाचे सहा आणि एका अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे.

महापालिका निवडणूक प्रामुख्याने भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन पक्षाच्या उमेदवारांमध्येच झाली. यामध्ये चार लाख ४७ हजार १०१ मते भाजपला मिळाली असून ४५.२० टक्के मतदारांनी पसंती दिली आहे. २०१७ च्या निवडणुकीत हे प्रमाण ३७ टक्के होते. त्या तुलनेत यंदा आठ टक्के भाजपच्या मतांमध्ये वाढ झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या उमेदवारांना तीन लाख ६३ हजार ३६१ मते मिळाली असून ३६.३७ टक्के मते पडली आहेत. २०१७ मध्ये तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसला २८.५३ टक्के मते मिळाली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढले. सन २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसला २८.५३ टक्के मते मिळाली होती. यंदा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला ३६.३७ टक्के मते पडली आहेत. गेल्या निवडणुकीपेक्षा ७.८४ टक्के जास्त मते मिळाली आहेत. परंतु, नगरसेवकांच्या संख्येत मागीलवेळी पेक्षा केवळ एक जागा जास्त आली आहे.

सहा नगरसेवक निवडून आलेल्या शिवसेना (शिंदे) पक्षाला ९१ हजार १७६ मते मिळाली आहेत. एकही नगरसेवक निवडून न आलेल्या शिवसेना (ठाकरे) पक्षाला ४१ हजार ७६८ मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने चार प्रभागात निवडणूक लढविली होती. त्यामध्ये त्यांच्या उमेदवारांना ६२ हजार ५९७ मते मिळाली आहेत. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना २७ हजार ८०२ आणि मनसेला १४ हजार ७६८ मते मिळाली आहेत. या पाच पक्षापेक्षा 'नोटा'ला जास्त मते मिळाली आहेत.

# महापालिका सभागृहात असणार चौथी, पाचवी पास अन् डॉक्टर, वकील, अभियंते





**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये निवडून आलेल्या १२८ नवनिर्वाचित नगरसेवकांमध्ये चौथी ते सातवीपर्यंत शिकलेले नऊ, आठवी ते नववीपर्यंत शिक्षण घेतलेले २२ नगरसेवक आहेत. दहावी आणि बारावीपर्यंत शिक्षण घेतलेले सर्वाधिक ५८ नगरसेवक आहेत. काही नगरसेवक पदवीधर, डॉक्टर, वकील, अभियंते आहेत.

महापालिकेमध्ये भाजपचे सर्वाधिक ८४, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे ३७, शिवसेना (शिंदे) पक्षाचे सहा आणि एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे. महापालिकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या १२८ नगरसेवकांच्या शैक्षणिक पात्रतेची आकडेवारी पाहिली असता, महापालिका सभागृह हे शिक्षणाच्या विविध स्तरांचे प्रतिनिधित्व करणारे व्यासपीठ ठरले आहे.

उच्चशिक्षित नगरसेवकांचाही महापालिकेच्या सभागृहात लक्षणीय सहभाग आहे. बीए, बीकॉम, बीएस्सी अशा पदवीधर नगरसेवकांची संख्या ३३ आहे. याशिवाय एमए, एमकॉम, एमएस्सी, एमबीए सारखे पदव्युत्तर पदवी घेतलेले सहा नगरसेवक निवडून आले आहेत. महापालिकेच्या सभागृहात डॉक्टर, वकील, अभियंते आणि शिक्षकही असणार आहेत. त्यामुळे आरोग्य, कायदा, शिक्षण आणि विकासकामांबाबत महापालिका सभागृहात अभ्यासपूर्ण चर्चा होऊ शकेल.

**अभियंते, वकील, डॉक्टर सभागृहात**

चौथी ते सातवीपर्यंतचे शिक्षण घेतलेले नऊ, आठवी व नववीपर्यंत शिक्षण झालेले २२, दहावी उत्तीर्ण असलेले २५, अकरावी व बारावीपर्यंत शिक्षण घेतलेले ३३ नगरसेवक आहेत. ३३ पदवीधर असून सहा जणांनी पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतले आहे. त्यामध्ये चार अभियंते, तीन शिक्षक, दोन वकील आणि एक डॉक्टरही महापालिका सभागृहात असणार आहेत.

**कोणत्या पक्षाचे किती नगरसेवक**

महापालिका निवडणुकीत भाजपची दुसऱ्यांदा एकहाती सत्ता आली आहे. भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा पराभव केला. भाजपच्या चारही आमदारांनी यशस्वी रणनिती अवलंबून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर मात केली. भाजपचे सर्वाधिक ८४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे केवळ ३७ नगरसेवक निवडून आले. शिवसेना (शिंदे) पक्षाचे सहा आणि एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे.

**चार वर्षांपासून बंद असलेली पदाधिकाऱ्यांची दालने खुली!**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रशासकीय राजवट संपून चार वर्षांनी नगरसेवकांच्या हाती कारभार जाणार आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात महापौर निवड होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने चार वर्षांपासून बंद असलेली पदाधिकाऱ्यांची दालने खुली केली असून सज्ज करण्याचे काम प्रशासनाने हाती घेतले आहे. दालने, महासभेचे सभागृह स्वच्छ करण्याचे काम सुरू आहे.

सत्तारुढ पक्षनेत्याच्या दालनात उपायुक्त अण्णा बोदडे, क्रीडा समिती सभापतीच्या दालनात उपायुक्त संदीप खोत, विरोधी पक्षनेत्याच्या दालनातून सहायक आयुक्त अतुल पाटील आणि विधी समिती सभापतीच्या दालनातून विशेष अधिकारी किरण गायकवाड कामकाज करत होते. त्यांच्यासाठी आता नवीन दालनांची व्यवस्था करावी लागणार आहे.

# निवडणुकीनंतर आता थकबाकीदार महापालिकेच्या रडारवर

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक पार पडल्यानंतर आता कर आकारणी व संकलन विभागाने मालमत्ता कर वसुलीवर भर दिला आहे. आजपासून थकबाकी असलेल्या मालमत्ता लाखबंद (सील) करण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. निवासी मालमत्तांचे नळजोड खंडित केले जाणार असून बिगरनिवासी मालमत्तांवर लाखबंदीची कारवाई केली जाणार असल्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र अशा सात लाख ३२ हजार २९६ मालमत्ता आहेत. त्यापैकी पाच लाख एक हजार ६३५ मालमत्ताधारकांनी ६८९ कोटी ६८ लाख रुपयांचा कर भरला आहे. निवडणुकीच्या महिन्याभराच्या कालावधीत कर वसुली थंडावली होती. आर्थिक वर्षे संपण्यास दोन महिने बाकी आहेत. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. दीड हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून काम करावे. थकबाकीदारांना कोणतीही सवलत न देता कारवाई करण्याचे आदेश सहाय्यक मंडल अधिकाऱ्यांना त्यांनी दिले आहेत.

मालमत्ता कर थकबाकी वसुलीसाठी विभागनिहाय स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत. थकबाकीदारांना जप्ती अधिपत्रे बजावण्यात येणार आहेत. अधिपत्र बजावल्यानंतरही संबंधित मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला नाही, तर त्यांच्या मालमत्तांवर लाखबंदीची कारवाई करण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत निवासी थकबाकीदारांचे नळजोड खंडित केले जाणार आहेत. बिगरनिवासी थकबाकीदारांच्या मालमत्तांवर लाखबंदीची कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनी चालू आर्थिक वर्षातील तसेच थकीत मालमत्ता कर तात्काळ भरून लाखबंदीची कारवाई टाळावी, असे आवाहन उपायुक्त पंकज पाटील यांनी केले आहे.

**आतापर्यंत ३५ मालमत्ता लाखबंद, १३३ जणांचे नळजोड खंडित**

वर्षभरापासून महापालिकेची शहरातील निवासी व बिगरनिवासी थकबाकीदारांवर कारवाई सुरू आहे. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत थकबाकी असलेल्या ३५ मालमत्तांवर लाखबंदीची कारवाई करण्यात आली आहे. १३३ थकबाकी मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित करण्यात आले आहेत.

**थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध करणार**

मालमत्ता कराचा भरणा केला नाही, अशा थकबाकीदारांची यादी महापालिकेमार्फत प्रसिद्ध केली जाणार आहे. ही यादी प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित थकबाकीदारांकडून याबाबत करण्यात येणारी कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नसल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले.

शहराच्या विकासासाठी मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा महसूल स्रोत आहे. या कराच्या माध्यमातून शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा व शिक्षण व्यवस्था सक्षमपणे राबवली जाते. वारंवार सूचना व नोटिसा देऊनही मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या मालमत्ताधारकांवर कारवाई करण्यात येणार आहे, असे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले.

# टेमगिरवाडी शाळेची राष्ट्रीय स्तरावर निवड

## एनआयईपीए, नवी दिल्लीकडून गौरव; 'यशस्वी शालेय नेतृत्व' राष्ट्रीय परिषदेत शाळेचा सहभाग

**पुणे (दै. संध्या) :**

खेड तालुक्यातील टेमगिरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक नवोपक्रम संस्थेने, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्था (एनआयईपीए), नवी दिल्ली यांनी ही निवड केली आहे. शालेय शिक्षणातील नाविन्यपूर्ण उपक्रम आणि प्रभावी शालेय नेतृत्वामुळे टेमगिरवाडी शाळेला हा मान मिळाला आहे.देशभरातून एकूण ५५ शाळांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील केवळ ४ शाळांचा समावेश आहे. या निवडीनंतर टेमगिरवाडी शाळेला नवी दिल्ली येथे १७ ते १९





जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या "यशस्वी शालेय नेतृत्वावर राष्ट्रीय परिषद : विकसित भारतासाठी नाविन्यपूर्ण मार्ग @२०४७" या राष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्याची संधी मिळाली.

या परिषदेत टेमगिरवाडी शाळेचे प्रतिनिधित्व शिक्षक दीपक रेटवडे यांनी केले. परिषदेदरम्यान शाळेत राबविण्यात येणाऱ्या ज्ञानरचनावादी अध्यापन–अध्ययन पद्धतीतील नवोपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शाळेच्या चार भिंतींपलीकडे नेणारा, अनुभवाधारित आणि जीवनकौशल्यांवर भर देणारा हा शैक्षणिक उपक्रम उपस्थित तज्ज्ञांकडून विशेष कौतुकास पात्र ठरला. या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, उपशिक्षणाधिकारी सिद्धार्थ चव्हाण, तसेच पंचायत समिती खेडचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी शाळेचे मुख्याध्यापक दीपक रेटवडे, शिक्षक छाया शिंदे, रामकृष्ण वाटेकर, विद्यार्थी आणि टेमगिरवाडी ग्रामस्थांचे अभिनंदन केले.

**शाळेला कोणते मिळणार फायदे**

या राष्ट्रीय स्तरावरील निवडीमुळे टेमगिरवाडी शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधिक वृद्धिंगत होणार आहे. शाळेतील नवोपक्रमांना व्यापक ओळख मिळेल, शिक्षकांच्या व्यावसायिक कौशल्यविकासाला चालना मिळेल तसेच शाळेची प्रतिमा राज्य व राष्ट्रीय स्तरावर अधिक भक्कम होण्यास मदत होणार आहे.

# आयटी कर्मचाऱ्यांना जडताहेत मणक्याचे विकार?

**पुणे (दै. संध्या) :**

**बैठ्या जीवनशैलीमुळे मणक्याच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. यात माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसह बैठी जीवनशैली असलेल्या इतर नोकरदार वर्गांचा प्रामुख्याने समावेश आहे. गेल्या काही वर्षांत मणक्याच्या विकारामुळे त्यावर शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या रुग्णांमध्ये ३५ ते ५० वर्षे वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे, अशी माहिती मणकाविकारतज्ज्ञ डॉ. राजेश पारसनीस यांनी दिली.**

पुणे असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स (पीएएसएस) संस्थेच्या वतीने असोसिएशन ऑफ स्पाईन सर्जन्स ऑफ इंडियाच्या (एएसएसआय) ३९ व्या 'एएसएसआयकॉन' या वार्षिक परिषदेचे आयोजन गुरूवारी ( दि.२२) करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर या परिषदेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. राजेश पारसनीस यांनी मणक्याच्या विकारांमध्ये होत असलेल्या वाढीकडे लक्ष वेधले. ते म्हणाले की, सध्या



जीवनशैली हा घटक मणक्यावर सर्वाधिक परिणाम करणारा ठरत आहे.

बैठ्या जीवनशैलीत दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. त्यामुळे मणक्यावर अतिताण येण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यातून मणक्याचे विकार जडतात. वेळीच शस्त्रक्रियेमुळे या समस्या दूर करता येतात. गेल्या काही वर्षांत मणक्याची शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यात प्रामुख्याने ३५ ते ५० वर्षे वयोगटातील रुग्ण त्यात असून, त्यातही नोकरदारांचे प्रमाण अधिक आहे.

परिषदेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. शैलेश हदगावकर म्हणाले की, मणक्याच्या शस्त्रक्रियांमध्ये दिवसेंदिवस आधुनिक तंत्रज्ञान येत आहे. रोबोटिक्स आणि कृत्रिम प्रज्ञा (एआय) यांचा वापर या शस्त्रक्रियांमध्ये केला जात आहे. त्यामुळे या शस्त्रक्रिया अधिक अचूक आणि प्रभावीपणे करता येत आहेत. याचबरोबर अगदी कमी चिरफाड या शस्त्रक्रियेमध्ये केली जाते. त्यामुळे रुग्णाचा रक्तस्राव कमी होतो आणि तो लवकर बरा होतो. मणक्याची शस्त्रक्रिया केलेली व्यक्ती त्याच दिवशी रुग्णालयातून घरी जाऊ शकते. आधुनिक तंत्रज्ञान मणक्याच्या शस्त्रक्रियेसाठी अतिशय मोलाचे ठरत आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रिया करताना रुग्णाला होणारा धोका मोठ्या प्रमाणात कमी होऊन सुरक्षितता अनेक पटीने वाढली आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पाईन सर्जन पुण्यात होणाऱ्या 'एएसएसआयकॉन' परिषदेच्या निमित्ताने गुरूवारी एकत्र येत आहेत. या परिषदेत १ हजार २०० स्पाईन सर्जन सहभागी होण्याची शक्यता आहे. मणक्याशी संबंधित विविध समस्या, स्कोलिओसिससारख्या विकृती, रिव्हीजन स्पाईन समस्या, लहान मुलांमधील मणक्याच्या समस्या आदी विषयांवर या परिषदेत चर्चा होणार आहे. याचबरोबर परिषदेच्या निमित्ताने आधुनिक पद्धतीने निदान, उपचार यासह शैक्षणिक व वैज्ञानिक चर्चासत्रे, शोधनिबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, टेडटॉक्स आदी उपक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

# आरटीओच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ६१ रक्तदात्यांचा सहभाग; रक्तदात्यांना प्रमाणपत्र व हेल्मेटचे वाटप

**पुणे (दै. संध्या) :**

समाजात निर्माण झालेल्या रक्ताच्या तीव्र टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे (आरटीओ) यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ६१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने सहभाग नोंदवून रक्तदान केले.रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच रस्त्यावर सुरक्षितपणे प्रवास करता यावा, या उद्देशाने प्रत्येक रक्तदात्यास हेल्मेटचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकीसोबतच रस्ता सुरक्षेचा संदेश देणारे हे उपक्रम नागरिकांनी विशेषतः कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.



प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले आणि सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी युवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी स्वतः रक्तदान करून केले.यावेळी रस्ता सुरक्षा पथक क्रमांक ०३ चे मोटार वाहन निरीक्षक संदीप मुरकुटे, रोहनसिंग गिरासे, अक्षय पोमण, दीपक राऊत, ऋषिकेश कोरडे तसेच वाहन चालक उमेश पवार यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून या उपक्रमात सहभाग नोंदवला.

# श्री क्षेत्र लेण्याद्री येथे माघी श्री गणेश जयंतीनिमित्त श्रींचा जन्मोत्सव उत्साहात साजरा

**जुन्नर (दै. संध्या)**



गुरुवार दि.२२ जानेवारी २०२६ रोजी माघी श्री गणेश जयंती उत्सवानिमित्त अष्टविनायकापैकी एक तिर्थक्षेत्र असलेले श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथे पारंपारीक पद्धतीने व मोठ्या उत्साहात श्रींचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. येथील श्री गिरीजात्मज गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची पहाटेपासुन मोठ्या प्रमाणात गर्दी होती.

यानिमित्त श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरात मोठी यात्रा भरली होती. 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदीरात सकाळी १० ते १२ या दरम्यान ह.भ.प. नामदेव महाराज वाळके यांचे देव जन्माचे किर्तन झाले तसेच यानिमित्त शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ ते शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे देवस्थानचे वतीने आयोजन केलेले आहे.

श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने पहाटे ०६.३० वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे यांच्या हस्ते श्री गिरिजात्मज गणेशाचा विधीवत अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्री गिरिजात्मज गणपतीचे हजारो भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. यानिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

दिवसभर भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. मंदिरात सकाळी १० ते १२ या दरम्यान ह.भ.प. नामदेव महाराज वाळके यांचे देव जन्माचे किर्तन झाले व पारंपारिक पद्धतीने श्री गणेश जन्मोत्सव सोहळा संपन्न झाला. त्यानंतर भाविक भक्तांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त प्रभाकर जाधव, मच्छिंद्र शेटे, सुरेश वाणी, प्रभाकर गडदे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, विजय वऱ्हाडी, नंदकुमार बिडवई, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

मंदिरात सकाळी ६ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ६ वाजता महाआरती करण्यात आली. श्री गणेश जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आलेल्या भाविक भक्तांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सेवा पुरवण्यात आल्या. दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे सुलभ दर्शन व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थानच्यावतीने केले होते.

देवाचे नैवेद्याकरीता गोळेगाव येथील राम मारुती कोकणे यांनी विविध प्रकारची फळे तसेच धनंजय खंडू बिडवई यांनी एक कॅरेट केळी व राशीण येथील सृष्टी रमेश मसाल यांनी दोन कॅरेट केळी दिलीत. दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घेतला तसेच जुन्नर परिसरातुन व पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक येथून मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते. श्री गणेश जयंती उत्सवानिमित्त देवस्थानचे वतीने शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ ते शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केलेले आहे. शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ रोजी ह.भ.प.श्रावण महाराज अहिरे यांचे काल्याचे किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आठ जिल्हा परिषद गटांसाठी 77 उमेदवार, तर पंचायत समिती गणांसाठी 163 जणांचे अर्ज

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यात आठ जिल्हा परिषद गटांसाठी एकूण ७७ जणांचे उमेदवारी दाखल झाले. तर पंचायत समितीच्या १६ गणांसाठी १६३ जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. विशेष म्हणजे उमेदवारीसाठीचे एबी फॉर्म देताना प्रमुख पक्षांची मोठी दमछाक झाली. तर काहींना एबी फॉर्म न मिळाल्याने इच्छुक नाराज झाल्याचे दिसून आले. मेदनकरवाडी, कडाचीवाडी व रासे पंचायत समिती गणातून शिंदे शिवसेना पक्षाने मेदनकरवाडीचे माजी उपसरपंच संजय सिताराम वाघमारे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. तर नाणेकरवाडी पंचायत समिती गणातून प्रियंका अमोल पाटोळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाकडून आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांच्या माध्यमातून सर्व गट आणि गणात उमेदवार देण्यात आले आहेत, असे अधिकृत सांगण्यात आले. भाजपच्या माध्यमातून सात गट आणि तेरा गणात उमेदवार दिले आहेत. तर शिंदे सेनेकडून पाच गट आणि १४ गणांत उमेदवार देण्यात आले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाकडून एकही उमेदवार दिलेला नाही, असे चित्र स्पष्ट झाले आहे. काळुस - मेदनकरवाडी : दत्तात्रय खांडेभराड (भाजप), गणेश आरगडे (शिवसेना उबाठा), विनोद टोपे (राष्ट्रवादी कॉंग्रेस); पाईट - आंबेठाण : निशा गोरे (शिवसेना), सुनिता बुट्टे पाटील (राष्ट्रवादी कॉंग्रेस), राजश्री जैद (शिवसेना उबाठा), माया डांगले (भाजप); शेलपिंपळगाव तर्फे खेड - मरकळ : विजयसिंह शिंदे पाटील, (शिवसेना उबाठा), श्रीनाथ लांडे ( शिवसेना), विष्णुदास थिटे ( भाजप ); कुरुळी - आळंदी ग्रामीण : विनया मुंगसे (शिवसेना उबाठा ), शितल येळवंडे (राष्ट्रवादी), कल्पना गवारी (भाजप); नाणेकरवाडी - महाळुंगे : जीवन खराबी (शिवसेना - उबाठा), गणेश बोत्रे (राष्ट्रवादी), संदीप सोमवंशी (भाजप), गणेश नाणेकर (शिवसेना ), वाडा - वाशेरे गट : समीर सुपे (राष्ट्रवादी), डॉ. संतोष सुपे (शिवसेना), विठ्ठल वनघरे ( शिवसेना - उबाठा).

### जिल्हा परिषद आठ जागांसाठी पन्नास, तर पंचायत समितीच्या गणांसाठी नव्वद अर्ज

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठीअर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषदेच्या आठ जागांसाठी पन्नास, तर पंचायत समितीच्या सोळा गणांसाठी नव्वद उमेदवारांनी अर्ज दाखल केले असुन ,उमेदवारांची संख्या वाढल्याने निवडणूक चुरशीची होणार आहे.राजकीय पक्षांच्या नेत्यांचा, नाराज उमेदवारांची नाराजी दूर करुन ,उमेदवारांची उमेदवारी माघारी घेण्यासाठी मोठा कस लागणार आहे. जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद ८ गट व पंचायत समिती १६ गण अशा एकूण २४ जागांसाठी १४० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील मोरे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनील शेळके यांनी दिली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले. तालुक्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी आळे पिंपळवंडी गटातून सर्वाधिक १०, तर पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उदापूर गणातून सर्वाधिक ९ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. जिल्हा परिषद गटाकरिता उमेदवारी अर्जांची संख्या - उदापूर- पूर- डिंगोरे ६, ओतूर धालेवाडी ६, आळे पिंपळवंडी १०, राजुरी-बेल्हे ४, बोरी बुद्रुक खोडद ५, नारायणगाव- वारूळवाडी ५, सावरगाव-कुसुर ८, बारव-तांबे ६. पंचायत समिती गणाकरिता उमेदवारी अर्जांची संख्या - उदापूर ९, डिंगोरे ५, ओतुर ६, धालेवाडीतर्फे हवेली ४, पिंपळवंडी ७, आळे ५, राजुरी ६, बेल्हे ५, बोरी बुद्रुक ६, खोडद ३, नारायणगाव ५, वारूळवाडी ५, सावरगाव ७, कुसूर ६, बारव ४, तांबे ७.

### राष्ट्रीय रोजगार मेळाव्यासाठी डॉ. सैय्यद यांना विशेष निमंत्रण



चाकण(दैनिक संध्या) : टॅलेंटकॉर्प सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद यांना मध्यप्रदेशातील सातपुडा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, बालाघाट येथे प्रजासत्ताक दिनी सोमवारी (दि.२६) आयोजित करण्यात आलेल्या भव्य राष्ट्रीय रोजगार मेळाव्यासाठी उद्योगतज्ज्ञ (इंडस्ट्री एक्स्पर्ट) म्हणून पॅनल चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यासाठी देशभरातून सुमारे २५ हजारांहून अधिक उमेदवार उपस्थित राहणार आहेत. हा मेळावा भारतातील एक महत्त्वाचा व मोठ्या स्तरावरील रोजगार मेळावा ठरणार आहे. या कार्यक्रमांतर्गत आयोजित पॅनल चर्चेचा विषय "भारतामधील सुशिक्षित बेरोजगारी आणि रोजगाराच्या उपलब्ध संधी" असा आहे. ही पॅनल चर्चा सातपुडा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स अध्यक्ष संजीव मिश्रा आणि भुवन दमाहे, संचालक, एल अँड टी ट्रेनिंग इन्स्टिट्यूशन यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली असून, त्यासाठी डॉ. मेहबूब सैय्यद यांना विशेष आमंत्रण देण्यात आले आहे. उद्योग, शिक्षण आणि कौशल्य विकास यामधील समन्वय साधून रोजगार निर्मिती कशी वाढवता येईल, यावर या चर्चेद्वारे सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## आळे येथील विद्यार्थ्यांना मोबाईलच्या दुष्परिणामांचे धडे

**आळेफाटा (दै. संध्या)**

आळे (ता. जुन्नर) येथील ज्ञानमंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'मोबाईलच्या अतिवापरामुळे अभ्यासावर होणारे दुष्परिणाम व मानसिक आजार' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सुमन व्यसनमुक्ती व मानसिक आजार उपचार केंद्र, आळेफाटा यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते संदीप निकम यांनी व्याख्यान दिले.

या प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना निकम म्हणाले की, "विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करावा. मोबाईलच्या अतिवापरामुळे एकाग्रतेचा अभाव, स्मरणशक्तीवर परिणाम, वेळेचा अपव्यय, थकवा यासारखे दुष्परिणाम होतात. तसेच मानसिक आजारांमध्ये डोळे कमजोर होणे, झोप न लागणे, एकाग्रता कमी होणे, मानसिक ताण, लठ्ठपणा, हृदयविकार आणि काही गंभीर मानसिक समस्या असे आजार होऊ शकतात. यामुळे अभ्यासावर नकारात्मक परिणाम होतो. यावर उपाय म्हणून विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे. तसेच, विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ व वाचन यांकडे आपला कल वाढवावा." या वेळी ऋषी साबळे, ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ डोके, सचिव डॉ. अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, विद्यालयाचे प्राचार्य संदीप भवारी, उपप्राचार्य सुरेश कुऱ्हाडे आदी उपस्थित होते.

## महाळुंगे - नाणेकरवाडी गटात चौरंगी लढत

**चाकण (दै. संध्या)**

■ जीवनशेठ खराबी यांचा उमेदवारी अर्ज दाखल




प्रचंड टोकाचे राजकारण असलेल्या आणि खेड तालुक्यात सर्वात श्रीमंत समजल्या जात असलेल्या महाळुंगे - नाणेकरवाडी जिल्हा परिषद गटात चौरंगी लढत होत असून, खराबवाडीचे माजी सरपंच जीवनशेठ खराबी यांनी अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केला. महाळुंगे - नाणेकरवाडी जिल्हा परिषद गटात चौरंगी लढत होत असल्याने मोठ्या प्रमाणात राजकीय उलथापालथ सुरू झाली आहे. खराबवाडीचे माजी सरपंच जीवनशेठ खराबी यांनी अखेरच्या दिवशी जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तळागाळात काम करणारे जीवन शेठ खराबी यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना खराबवाडीचे ग्रामस्थ यांनी मोठ्या प्रमाणात एकजूट दाखवली. खेडचे प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांच्याकडे खराबी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. वाद्यवृंदाच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत कार्यकर्त्यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले. जीवनशेठ तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देत मतदारांनी परिसर दणाणून सोडला होता. महाळुंगे - नाणेकरवाडी या जिल्हा परिषद गटातील विकास, पाणी, रस्ते, वीज, आरोग्य तसेच सामाजिक प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत जीवनशेठ खराबी यांनी जनतेत आपली ठाम ओळख निर्माण केली आहे. महाळुंगे - नाणेकरवाडी या जिल्हा परिषद गटात चौरंगी लढत होत असून, या गटात तुल्यबळ व मातब्बर निवडणुकीच्या रिंगणात उतरले असल्याने या गटातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जीवनशेठ खराबी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने इतर उमेदवारांपुढे कडवे आव्हान उभे राहिले आहे.

> खराबी यांनी घर टू घर प्रचारास सुरुवात केल्याने प्रचाराची रंगत वाढली आहे. सर्वात श्रीमंत समजल्या जात असलेल्या या जिल्हा परिषद गटाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, येथील निकाल स्थानिक राजकारणाची दिशा ठरवणारा आहे.

## ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या राष्ट्रीय परिषदेत
# महाराष्ट्रातील सौर कृषी क्रांतीचा गौरव

**केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. मनोहर लाल यांच्याहस्ते महावितरणला पुरस्कार**

**बारामती (दै. संध्या)**




शेतीसाठी वीजपुरवठा करणाऱ्या कृषी वीजवाहिन्यांच्या सौर ऊर्जीकरणात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महावितरणचा ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या (AIDA) 'एडिकॉन-२०२६' या राष्ट्रीय परिषदेत बुधवारी (दि. २१) पुरस्काराने गौरव करण्यात आला. केंद्रीय ऊर्जामंत्री ना. श्री. मनोहर लाल यांच्याहस्ते महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली देशातील वीज वितरण क्षेत्रातील विविध संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या (AIDA) 'एडिकॉन-२०२६' राष्ट्रीय परिषदेचे नवी दिल्ली येथे दि. २१ व २२ ला आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्‌घाटन केंद्रीय ऊर्जामंत्री ना. श्री. मनोहर लाल यांच्याहस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आणि ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. लोकेश चंद्र, सरचिटणीस डॉ. आशिष कुमार गोयल, महासंचालक श्री. आलोक कुमार यांची उपस्थिती होती. या परिषदेत देशभरातील वीज वितरण कंपन्यांचे पदाधिकारी व ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते.

आशियातील सर्वात मोठा विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० चा 'एडिकॉन-२०२६' परिषदेत गौरव करण्यात आला. या योजनेत आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल ८ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. तब्बल २३१ विकासकांकडून या योजनेमध्ये १६ हजार मेगावॅटचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प वेगाने उभारण्यात येत आहेत.

शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अत्यंत उपयुक्त ठरत आहे.



## सासवडमध्ये 'बजाज पुणे ग्रँड टूर'चा दिमाखदार सोहळा

**सासवड (दै. संध्या)**

पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'बजाज पुणे ग्रँड टूर-२०२६' या देशातील सर्वात मोठ्या सायकल स्पर्धेचा तिसऱ्या टप्प्याचा शुभारंभ गुरुवारी (ता. २२) सासवड नगरीत अत्यंत उत्साहात पार पडला. ऐतिहासिक शिवतीर्थावरून दुपारी १२:३० वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. याप्रसंगी खासदार सुनेत्रा पवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांसह प्रशासकीय अधिकारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरंदर तालुक्याने आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाने आणि आदरातिथ्याने परदेशी सायकलपटूंची मने जिंकली. स्पर्धेच्या सुरुवातीला सासवड शहरातील विविध विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून आकर्षक नृत्ये सादर केली. ढोल-ताशांचा गजर, टाळ्या, शिट्ट्या आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' व 'भारत माता की जय'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सायकलपटूंच्या स्वागतासाठी शिवस्मृती प्रतिष्ठान आणि राष्ट्रध्वज समितीच्या वतीने पालखी तळावर ध्वजारोहण करण्यात आले.

# बजाज पुणे ग्रँड टुर रेसचे नीरा शहरात जल्लोषात स्वागत

**नीरा (दै. संध्या)**




बजाज पुणे ग्रँड टुर आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्यातील सायकल स्वारांचे गुरुवारी (दि.२२) नीरा शहरात उत्स्फूर्त व जल्लोषात स्वागत करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांचे निनाद, नागरिकांची उस्फूर्त गर्दी आणि देशभक्तीपर घोषणांमुळे नीरा शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

गुरुवारी (दि.२२) आयोजित बजाज पुणे ग्रँड टुर आंतरराष्ट्रीय सायकल रेस स्पर्धेच्या स्टेज क्रमांक ३ मध्ये सायकल स्वार दुपारी सुमारे दोनच्या सुमारास नीरा शहरात दाखल झाले. सासवड येथील नगरपरिषदेच्या समोरील शिवतीर्थावरून या टप्प्याचा शुभारंभ झाला होता. या टप्प्यात सासवड, सुपे, पानवडी, काळदरी, मांढर, माहूर, परिंचे, हरणी, वाल्हे, पिसुर्टी, निरा, ब्राह्मणदरा असा प्रवास करत सायकल स्वार पुढे बारामतीकडे रवाना झाले. नीरेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सायकल स्वारांचे आगमन होताच शालेय विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

नीरेची मुख्य बाजारपेठ असलेल्या लक्ष्मी रस्त्यावर तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहिल्यादेवी होळकर चौक, बुवासाहेब चौक आणि मोरगाव चौक या मार्गांवर नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी केली होती. काही युवकांनी तिरंगा ध्वज हातात घेत "भारत माता की जय" व "वंदे मातरम्" अशा देशभक्तीपर घोषणा दिल्या. सायकल स्वार जात असताना प्रेक्षकांनी टाळ्या वाजवत चिअरप केल्याने वातावरण भारावून गेले होते. लक्ष्मी रस्त्यावरील उंच इमारतींवरूनही नागरिकांनी सायकल स्पर्धेचा आनंद घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे, ग्रामपंचायत सदस्य राधा माने, वैशाली काळे, अभिषेक भालेराव, ॲड. पृथ्वीराज चव्हाण, ॲड. आदेश गिरमे, तलाठी सुनील पाटोळे, ग्रामविकास अधिकारी रमेश राऊत, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नरेंद्र बागूल, जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे, उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लिलावती रिखवलाल शहा कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या, तर महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांचे वादन करत सायकल स्वारांचे स्वागत केले. कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निर्मला माने व गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल धुमाळ यांनी स्वागत कार्यक्रमाचे समन्वय साधला.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या निमित्ताने नीरेतील छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि बुवासाहेब चौक येथे आकर्षक सजावट करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सायकल स्पर्धेचा लोगो तर बुवासाहेब चौकात तीन सायकल स्वारांची प्रतिकृती नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती. स्पर्धा संपल्यानंतर नागरिकांनी या ठिकाणी सेल्फी व फोटो काढण्याचा आनंद घेतला.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकल स्पर्धा आपल्या गावातून जात असल्याचा अभिमान व्यक्त करत अनेक नागरिकांनी सोशल मीडियावर फोटो व व्हिडिओ स्टेटस स्वरूपात शेअर केले. या स्पर्धेमुळे नीरा शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा नकाशावर उजळून निघाल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत होती.

# राजकीय पक्षांच्या उमेदवारीची उत्सुकता कायम, अर्ज दाखल करण्यासाठी झुंबड

सांगली (दै. संध्या)

एकमेकांना शह-काटशह कायम ठेवण्यासाठी उमेदवारीबाबतची उत्सुकता राजकीय पक्षांनी कायम राखली असताना बुधवारी अखेरच्या दिवशी जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. उमेदवारांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत, ढोलताशांचा गजर करत मिरवणुकीने उमेदवारी अर्ज दाखल केले.



सांगली जिल्ह परिषदेच्या ६१ गटासाठी आणि दहा पंचायत समितीच्या १२२ गणांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस होता. राजकीय पक्षांकडून उमेदवारांची यादी जाहीर होईल या अपेक्षेने काही जणांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे टाळले होते. अखेर बंडखोरी टाळण्यासाठी राजकीय पक्षांनी ज्यांची उमेदवार म्हणून निवड केली आहे त्यांच्या हातात पक्षाचे एबी फॉर्म घरपोच केले.

यामुळे सर्वच राजकीय पक्षांकडून अखेरपर्यंत उमेदवारांची यादीच जाहीर करण्यात आली नाही. यामुळे महायुती व महाविकास आघाडी यांच्या उमेदवाराबाबतची उत्सुकता आजही कायम राहिली आहे. तर राजकीय पक्षाचे चिन्ह मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर अनेक इच्छुकांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

भाजप महायुतीकडून जिल्हा परिषदेच्या सर्वच्या सर्व म्हणजे ६१ जागासाठी आणि पंचायत समितीच्या १२२ जागासाठी उमेदवार निश्चित करून आज दुपारी संबंधित उमेदवाराच्या हाती पक्षाच्या जिल्हाध्यक्षांच्या स्वाक्षरीचे एबी फॉर्म दिले. तर महाविकास आघाडीतील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी निवडणुकीत आपल्या पक्षाचे म्हणजे हात आणि तुतारी एकमेकाविरूध्द येणार नाही अशा पध्दतीने उमेदवार दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने काही ठिकाणी महाविकास आघाडीशी जागा वाटपात तडजोडीची भूमिका स्वीकारत तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीचा पर्याय स्वीकारत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

येलूर (ता. वाळवा) गटातून जिल्हा बँकेचे संचालक राहूल महाडिक यांच्या पत्नी हर्षदा महाडिक यांनी आज शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच आमदार गोपीचंद पडळकर यांच्या भावजय माधवी पडळकर यांनी निंबवडे (ता. आटपाडी) गटातून ढोलताशांच्या गजरात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच शिवसेनेचे जिल्हा बँकेचे संचालक तानाजी पाटील यांचे पुत्र पृथ्वीराज पाटील यांनी दिघंची गटातून कुणबी प्रमाणपत्राच्या आधारावर ओबीसी राखीव गटातून उमेदवारी दाखल केली आहे.

माजी आमदार मानसिंगराव नाईक यांचे चिरंजीव विराज नाईक यांनी मांगले जिल्हा परिषद गटातून आपली उमेदवारी दाखल केली आहे. जयराज पाटील यांनी कामेरी गटातून उमेदवारी अर्ज भरला आहे. दरम्यान, वाळवा तालुक्यातून महायुती एकत्रितपणे निवडणूक लढवत असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून जिल्हा परिषदेच्या दोन जागा व पंचायत समितीच्या सहा जागा लढवत आहे.

खानापूर तालुक्यातील भाळवणी गटातून शिवसेनेचे आमदार सुहास बाबर यांच्या भावजय व विट्याचे उपनगराध्यक्ष अमोल बाबर यांच्या पत्नी डॉ. शीतल बाबर यांनी उमेदवारी दाखल केली आहे. तर बागणी (ता. वाळवा) गटातून आमदार सदाभाऊ खोत यांच्या स्नुषा मोहिनी खोत, आणि कोकरूड गटातून भाजप आमदार सत्यजित देशमुख यांच्या कन्या साईतेजस्वी देशमुख यांनी उमेदवारी दाखल केली आहे.

# जयकुमार गोरेंची भाषा अहंपणाची – शंभूराज देसाई

सातारा (दै. संध्या)

पाटण विधानसभा मतदारसंघाबाबत ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेली भाषा अहंपणाची असून, त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली आहे. भाजपमध्ये प्रवेश केलेल्या पाटणकर गटाच्या १०२ गावांमधील १ हजार ९६६ प्रमुख कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. गोरे यांनी निवडणूक काळात कुठलेही पॅकेज जाहीर केले, तरी पाटणची जनता भूलणार नाही, असा पलटवार पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी गोरे यांच्यावर केला.

दरम्यान, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीबाबत भाजपकडून कोणताही प्रतिसाद नसल्याने शिवसेना येत्या दोन दिवसांत आपला निर्णय जाहीर करणार असल्याचेही देसाई यांनी म्हटले आहे. शंभूराज देसाई म्हणाले, 'पाटणच्या जनतेने मला तीस हजारांच्या मताधिक्याने निवडून दिले आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी आम्ही विकासकामांच्या जिवावर निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. जनता विकासकामे बघून आमच्या पाठीशी राहील.'



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी पालकमंत्री या नात्याने मी महायुतीतील घटक पक्षांची युती घडवून आणण्याचा प्रयत्न केला, मात्र नगरपालिका निवडणुकीप्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्येदेखील भाजपकडून बिलकूल प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे येत्या दोन दिवसांत शिवसेना आपली भूमिका स्पष्ट करेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

देसाई म्हणाले, 'जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमध्ये महायुतीमधील घटक पक्षांची युती करण्यासंदर्भात बैठक घेण्यासाठी मी पुढाकार घेतला होता. शिवेंद्रराजे भोसले यांनीदेखील पालकमंत्र्यांनी बैठक घ्यावी, अशी मागणी केली होती. त्यानुसार मी दोन दिवसांपूर्वी भाजपचे आमदार, खासदार आणि दोन्ही मंत्र्यांना निमंत्रण पाठवले होते. मात्र, बैठकीला भाजपचे दोन्ही मंत्री आले नाहीत. भाजपने केवळ माजी जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांना चर्चेसाठी पाठवले होते. त्यांच्याशी चर्चा झाली; मात्र निवडणुकीतील युतीचा निर्णय भाजपचे मंत्री आणि खासदार, आमदार यांना विचारून घेऊ, असे त्यांनी सांगितले.'

पालकमंत्री म्हणून मी युती करण्यासंदर्भात बैठकीबाबत भाजपच्या नेत्यांना निमंत्रण पाठवले होते. केवळ जिल्हाध्यक्ष डॉ. अतुल भोसले त्या वेळी बैठकीला आले; मात्र त्यांनीदेखील आमदार, मंत्री यांना विचारून निर्णय घेऊ, असे स्पष्ट केले होते. दोन वेळचा अनुभव पाहता भाजपकडून युती संदर्भात कोणताही प्रतिसाद मिळत नाही. आता शिवसेना म्हणून आमचे पदाधिकारी एकत्र बसून, पुढील रणनीतीसंदर्भात निर्णय घेतील, असेही देसाई यांनी स्पष्ट केले.

ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेली भाषा अहंपणाची असून, त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली आहे. भाजपमध्ये प्रवेश केलेल्या पाटणकर गटाच्या १०२ गावांमधील १ हजार ९६६ प्रमुख कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. गोरे यांनी निवडणूक काळात कुठलेही पॅकेज जाहीर केले, तरी पाटणची जनता भूलणार नाही, असा पलटवार पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी गोरे यांच्यावर केला.

# शिरोळ पालिकेच्या बांधकाम सभापतीपदी अनिता संकपाळ

## महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी कल्पना काळे, शरद मोरे शिक्षण, तर विजय आरगे आरोग्य सभापती

शिरोळ (दै. संध्या)

शिरोळ नगरपालिकेच्या विशेष समित्यांच्या निवडी मंगळवारी पालिका सभागृहात पार पडल्या. स्थायी समितीच्या सभापतीपदी नगराध्यक्षा योगिता कांबळे यांची निवड झाली. सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी अनिता संकपाळ, स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी विजय आरगे, पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापतीपदी उपनगराध्यक्ष पृथ्वीराजसिंह यादव, महिला व बाल कल्याण समितीच्या सभापतीपदी कल्पना काळे, उपसभापतीपदी अनुराधा गुरव, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी शरद उर्फ बापू मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

शिरोळ पालिकेतील विषय समिती अशी; स्थायी समितीच्या सभापतीपदी नगराध्यक्षा योगिता कांबळे, सदस्य उपनगराध्यक्ष पृथ्वीराज यादव, अनिता गजानन संकपाळ, कल्पना पंडित काळे, विजय वसंतराव आरगे, शरद उर्फ बापू सुरेशराव मोरे. सार्वजनिक बांधकाम समिती सभापती- अनिता गजानन संकपाळ, सदस्य - ओंकार अरुण माने - गावडे, सविता बबन पुजारी, अमरसिंह शिवाजीराव पाटील. स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी- विजय वसंतराव आरगे, सदस्य - उल्हास लक्ष्मण आवळे, सुवर्णा अरुण कांबळे, शिवानी सुरज कांबळे. पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती सभापतीपदी - उपनगराध्यक्ष पृथ्वीराजसिंह अशोकराव यादव, सदस्य - दीपक कृष्णराव भाट, राहुल अनिल कोळी, अमरसिंह कृष्णराव शिंदे. महिला व बाल कल्याण समिती सभापती - कल्पना पंडित काळे, उपसभापती - अनुराधा सत्यजित गुरव, सदस्य- दिपाली विवेक फल्ले, श्वेता संतोष जाधव. शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापती शरद उर्फ बापू सुरेशराव मोरे, विदुला विराजसिंह यादव, रेखा बाळासो कोरे, शाहू सुकुमार कोळी.

नगराध्यक्षा योगिता कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि पिठासन अधिकारी तथा मुख्याधिकारी निशिकांत प्रचंडराव नगरसेवकांच्या उपस्थितीत विशेष समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड झाली. यामध्ये विरोधी शाहू आघाडीच्या नगरसेवकांनाही समितीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. शिरोळ पालिकेत उपनगराध्यक्ष पृथ्वीराजसिंह यादव यांच्या नेतृत्वाखाली शिव-शाहू आघाडी प्रणित यादव पॅनेलने यश मिळवले आहे. मंगळवारी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत विशेष समितीच्या सभापती पदासाठी नामनिर्देशन दाखल करण्यात आले. यानंतर मुख्याधिकारी प्रचंडराव यांच्याकडे विशेष समितीच्या सभापती पदाचे पत्र सादर करण्यात आले. सायंकाळी चार वाजता निवड झालेल्या विशेष समिती सभापती आणि सदस्यांची यादी जाहीर करण्यात आली. यावेळी कल्पना काळे, दिपाली फल्ले, अनुराधा गुरव, ओंकार माने-गावडे, दीपक भाट, सचिन शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना शिरोळ शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे पारदर्शी आणि लोकाभिमुख कारभार करण्याचा विश्वास व्यक्त केला.

# मुलाचा अचानक मृत्यू, सावडायची तयारी सुरू असतानाच आई कोसळली

कोल्हापूर (दै. संध्या)

माय लेखाची नाळ ही जन्मापासूनच घट्ट जुळलेली असते. त्यामुळे आपल्या मुलाला झालेल्या वेदना आई कोणत्याही परिस्थितीत अनुभवू शकते. मुलाच्या निधनानंतरचा मोठा धक्का फक्त आई-वडीलच समजू शकतात. कित्येकदा अशा घटनांमध्ये कधीही न सावरण्या इतपत दुःख वाट्याला येत असते. अशीच एक घटना कोल्हापुरातील एका कुटुंबासोबत घडली आहे. मुलाच्या भडाग्नी शांत होण्याआधीच आईने देखील प्राण सोडण्याची घटना कोल्हापुरात घडली आहे. त्यामुळे कोल्हापुरातील गांधीनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सांगवडे (ता. करवीर) येथील एका कुटुंबावर हे दुर्दैवी संकट कोसळले. 35 वर्षीय स्वप्निल ऊर्फ



अनिल कुमार बिरांजे यांच्या अचानक निधनाचा धक्का त्यांच्या 55 वर्षीय आई माया कुमार बिरांजे यांना सहन झाला नाही. पुत्राच्या चितेची आग अजूनही धगधगत असताना आईनेही जगाचा निरोप घेतला, यामुळे संपूर्ण गाव शोकसमुद्रात बुडाले. रविवार (18 जानेवारी) रोजी ही घटना घडली असून अजूनही नातेवाईक आणि गावकरी या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करत आहेत.

**पुत्राच्या निधनाची वेदनादायी कहाणी..**

रविवारी दुपारी 12 च्या सुमारास स्वप्निल यांचे अचानक निधन झाले. ते एका खासगी कंपनीत नोकरीला होते आणि कुटुंबातील मुख्य कर्ते पुरुष होते. काही दिवसांपूर्वीच त्यांच्या आई माया माहेरी गेल्या होत्या. मुलाच्या निधनाचे दु:खद वृत्त कानी पडताच त्या रविवारी रात्री उशिरा घाईघाईने गावी परत आल्या. पुत्राच्या अचानक विच्छेदाने व्याकूळ झालेल्या मातेच्या डोळ्यांतील अश्रू थांबले नाहीत. सोमवारी सकाळी 8 वाजता स्वप्निल यांच्या रक्षाविसर्जनाची तयारी सुरू असतानाच स्वप्नील यांच्या आईचा देखील मृत्यू झाला. त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

**एकाच वेळी आई-पुत्राने घेतला जगाचा निरोप**

सोमवारी सकाळी आई-पुत्राच्या एकाचवेळी रक्षाविसर्जनाची वेळ आली. स्वप्निल यांच्या चितेची आग विझण्यापूर्वीच त्यांच्या आईचे पार्थिवही चितेवर ठेवले गेले. हे दृश्य पाहून उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले होते. स्वप्निल यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, वडील, एक भाऊ आणि दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे. नववधू आणि लहान मुलांच्या डोक्यावर आई-पुत्राच्या निधनाने दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

आईच्या निधनाने पुत्रप्रेमाची एक अमर कथा यामुळे घडली आहे. पुत्राच्या जन्मापासून आईने त्याला सुख-दु:खात साथ दिलेली असते. पुत्राच्या पार्थिवासमोर तिचे हृदय तुटले आणि तीही त्याच्या सोबत गेली. अशी ही मायलेकाच्या जोडीची दुर्मीळ घटना गावकऱ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे. यानिमित्ताने'मातृप्रेम अमर असते' ही म्हणच पुन्हा एकदा साकारली गेली आहे. दरम्यान गावकऱ्यांनी कुटुंबाला धीर देण्याचा प्रयत्न केला, तरी परिसरातील शोकाची लाट अद्याप थांबलेली नाही.

# गहाळ मोबाईल मूळ मालकांच्या स्वाधीन

कराड (दै. संध्या)

कराड शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून गहाळ झालेले मोबाईल शोधून ते मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले. कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केलेले या कारवाईत सुमारे १० लाख रूपये किंमतीचे ४० स्मार्ट मोबाईल हस्तगत केले. कराड शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्या हस्ते शनिवारी सदरचे मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, कराड शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून मोबाईल चोरी, गहाळ होण्याचे प्रमाण वाढले होते. त्या अनुषंगाने पोलिस अधीक्षक तुषार दोषी, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, पोलिस उपाधीक्षक राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कराड शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांनी हरविलेल्या मोबाईलचा शोध घेण्याच्या सूचना शहर पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने सीईआयआर पोर्टल व तांत्रिक बाबींच्या आधारे महाराष्ट्रासह इतर राज्यातून मोबाईल धारकांशी वारंवार संपर्क करून गहाळ झालेले १० लाखांचे ४० मोबाईल हस्तगत केले.

# काँग्रेसचा नेता राष्ट्रवादीत; भाजपला मोठा धक्का

## बावधन–शेंदुरजणे गणात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे बळ, विराज शिंदेंच्या प्रवेशाने वाई तालुक्यात राजकीय भूकंप

वाई (दै. संध्या)

वाई तालुक्यातील राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरलेल्या एका घडामोडीत, काही काळ युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहिलेले, मंत्री जयकुमार गोरे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे युवा नेते विराज शिंदे, माजी पंचायत समिती सदस्या रुतुजा शिंदे यांच्यासह बावधन व शेंदुरजणे गणातील असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा किसन वीर कारखाना कार्यस्थळावर मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी माझ्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. व्यासपीठावर प्रमोद शिंदे, मोहन जाधव, प्रताप पवार, मदन भोसले, किरण काळोखे, अरविंद कुदळे, शंकर शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मेघराज शिंदे, सोसायटी चेअरमन



प्रकाश मारुती शिंदे, माजी सरपंच रामदास खामकर, अतुल जाधव, नितीन मांढरे, विशाल मांढरे, गणेश जाधव, आनंद मांढरे, अविनाश गाढवे, मयूर गाढवे, प्रकाश एरंडे, शांताराम शिंदे, अजिंक्य शिंदे, अनिल कांबळे, सचिन चव्हाण, योगेश देशमाने, योगेश महांगडे, नारायण महांगडे, शिवाजी कांबळे, राजू शिंदे पाटील, मोहन महांगडे, विनय शिंदे, ज्ञानेश्वर पवार, विशाल महांगडे, नरेंद्र माऊली शिंदे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. प्रतापराव पवार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन दिलीप पिसाळ यांनी केले. मदन भोसले यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला बावधन जिल्हा परिषद गट, शेंदुरजणे गण व बावधन गणातील असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विराज शिंदे म्हणाले, टोकाचे विरोधक म्हणून ओळखले जाणारे आम्ही आज एकत्र आलो आहोत, हे अनेकांना आश्चर्यकारक वाटेल. पण हा निर्णय वैयक्तिक राजकारणासाठी नाही, तर बावधन व शेंदुरजणे भागाच्या स्वाभिमानासाठी घेतला आहे. येथील नेतेमंडळी व कार्यकर्त्यांनी दोन पावले मागे घेत एकोप्याचा मार्ग स्वीकारला. मतभेद विसरून या भागाच्या विकासासाठी एकत्र काम करण्याचा निर्धार आम्ही केला आहे.

# राजवाडा बस स्टॉप येथे गाडी लावण्यावरून मारहाण

सातारा (दै. संध्या)

राजवाडा बस स्टॉप परिसरात गाडी काढण्याच्या कारणावरून दोन गटांत वाद होऊन मारहाणीचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी शाहूपुरी पोलिस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या आहेत.

राजवाडा बस स्टॉपसमोरील कॉलिटी पान शॉपसमोर श्रेयस संतोष पवार (वय २२, रा. मंगळवार पेठ, सातारा) याने भाजीपाल्याची चारचाकी गाडी लावली होती. यावेळी शाईद राजमहंमद बागवान (रा. यादोगोपाळ पेठ, सातारा) याने येथे गाडी लावू नये, तत्काळ गाडी काढावी असे सांगितले. पवार याने थोड्या वेळात गाडी काढतो असे सांगितल्याने शाईद बागवान व अल्ताफ बागवान यांनी चिडून जाऊन हाताने मारहाण केल्याची फिर्याद श्रेयस पवार याने दिली आहे. दरम्यान याच घटनेत पान टपरीच्या काचा व खुर्च्या फोडून नुकसान केल्याचा, तसेच 'गोळ्या घालून खल्लास करेन' अशी धमकी देत फळगाडा ढकलून पलटी केल्याचा आरोप शाईद बागवान यांनी आपल्या फिर्यादीत केला आहे. याप्रकरणी दि. १९ रोजी रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास शाहूपुरी पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले असून अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक ढेरे व धमाळ करत आहेत.

# करमाळ्यात इच्छुक उमेदवारांचे शक्तिप्रदर्शन

## जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणूक; तिरंगी–चौरंगी लढतीचे संकेत

करमाळा (दै. संध्या)

करमाळा तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विविध राजकीय पक्ष, आघाड्या तसेच अपक्ष उमेदवारांकडून अर्ज दाखल करण्याची जोरदार लगबग सुरू असून, अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी मोठ्या हालचाली होण्याची दाट शक्यता आहे.

मंगळवार दि. २० रोजी अखेरपर्यंत जिल्हा परिषदेसाठी १६, तर पंचायत समितीसाठी ५० असे एकूण ६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे आतापर्यंत तब्बल ६५४ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली असून, बुधवारी मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल होतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे करमाळा तहसील कार्यालयात गर्दी, शक्तिप्रदर्शन आणि राजकीय घडामोडींना वेग येण्याची चिन्हे आहेत. करमाळा तालुक्यात जिल्हा परिषदेचे सहा गट असून पंचायत समितीला बारा गण आहेत इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने बंडखोरी होण्याची शक्यता आहे.

मंगळवारी जिल्हा परिषदेसाठी केम, चिखलठाण, वीट, पांडे, कोर्टी, पंचायत समितीच्या साडेगण, हिसरे, रावगाव, वांगी, केतूर आदी गटांतून अनेक इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यामध्ये संजय देवकर, साधना पवार, कल्याणी तळेकर, विकास गलांडे, अश्विनी चिवटे, राणी वारे, ज्योती सावंत, सविता राजेभोसले, वनिता गुळवे, योगिनी राजेभोसले, राजलक्ष्मी मोरे-पाटील, महावीर तळेकर, उद्धव भोसले, बाजीराव माने, दशरथ घाडगे, शशिकांत शेलार, भरत आवताडे, आकाश अवताडे, नवनाथ जगदाळे, हनुमंत निळ, समाधान फरतडे, दीपा कांबळे , जितेश कांबळे, सोनाली तकिक, गायत्री शेळके, शर्मिली रोकडे, संतोष वारगड, सुहास मिसळ, विठ्ठल मोरे, अजिनाथ विघ्ने, उदयसिंह मोरे, शहाजी पाटील, बाळासाहेब जरांडे, नितीन राजेभोसले, विलास कोकणे, किरण निंबाळकर, अमोल जरांडे, संभाजी शिंदे, संजयकुमार जाधव, नानासाहेब आढाव, सुमित गिरंजे, मोहम्मद शरीफ जमीर शेख, नाना झाकणे, नवनाथ दुरंदे, रेवणनाथ साखरे आदींचा समावेश आहे. वांगी गटांत मात्र अद्याप एकही अर्ज दाखल न झाल्याचे चित्र आहे. पंचायत समिती गणामध्ये चिखलठाण गण जेऊर वीट गणात मंगळवारी एकही अर्ज दाखल झाला नाही बुधवारी मात्र सर्व गटाकडून अर्ज दाखल होणार आहेत.

**महायुतीमधून अठरा जागी उमेदवार उभा करणार**

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आ. नारायण पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल केले. बुधवारी त्यांच्या गटाकडून अधिक जोमाने अर्ज भरण्यात येणार असल्याचे संकेत आहेत. त्यांच्या गटाने अपक्ष करमाळा तालुका विकास आघाडी'च्या माध्यमातून ताकद दाखवण्याची तयारी केली आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांची युती झाली आहे. मात्र तालुक्यात राष्ट्रवादी (अजित पवार गट) भाजपाची युती झाली आहे. भाजपा व राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांची करमाळा तालुक्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आदेशानुसार पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आगळीवेगळी युती झाल्यानंतर जिल्हा परिषद तीन व पंचायत समिती प्रत्येकी सहा अशा नऊ जागा भाजपा व राष्ट्रवादी यांना मिळाले असून महायुतीमधून अठरा जागी उमेदवार उभा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जागा वाटपानुसार उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यात येत आहेत. भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्यासह इतर उमेदवारांचे अर्ज विलास घुमरे, भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल होणार आहेत.

एकत्र आल्याने चर्चांना उधान माजी आमदार संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काही उमेदवारांनी आधीच अर्ज दाखल केले आहेत. शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे माजी आमदार जयवंत जगताप यांच्या गटाकडूनही समर्थकांचे अर्ज दाखल होणार असून भाजपा–राष्ट्रवादी युतीनंतर त्यांच्या भूमिकेकडे विशेष लक्ष लागले आहे. मंगळवारी दुपारी खा. मोहिते पाटील आणि जयवंत जगताप गट एकत्र आल्याने चर्चांना उधाण आले आहे. शिवसेनेकडून जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असू त्यांच्या पक्षाकडूनही शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल होणार आहेत. तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक तिरंगी की चौरंगी होणार, याबाबतचे स्पष्ट चित्र बुधवारी अर्जांची अंतिम संख्या जाहीर झाल्यानंतर समोर येणार आहे. गटातटाच्या राजकारणाला यंदा ठळक पक्षीय स्वरूप प्राप्त झाल्याने ही निवडणूक अधिकच चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# कोल्हापूरच्या सुकन्याचा अमेरिकेत डंका;

## उपमहापौरपदी उर्मिला पुरंदरे-अर्जुनवाडकरांची निवड




कोल्हापूर (दै. संध्या)

शिक्षणाचे माहेरघर असलेल्या जयसिंगपूर शहराला अमेरिकेतून अभिमानाची बातमी मिळाली आहे. शहरातील चौथ्या गल्लीतील अर्जुनवाडकर कुटुंबातील सुकन्या उर्मिला अशोक पुरंदरे-अर्जुनवाडकर (उमा) यांची न्यूजर्सी प्रांतातील होपवेल टाउनशिपच्या उपमहापौरपदी पुन्हा निवड झाली. या निवडीमुळे जागतिक स्तरावर जयसिंगपूरचे नाव उजळले असून, मराठी महिलेच्या कर्तृत्वाने मराठी मातीचा मान वाढला आहे.

उर्मिला यांचे बालपण आणि प्राथमिक शिक्षण जयसिंगपूरमध्ये झाले. जनार्दन अर्जुनवाडकर यांच्या कुटुंबातील या कन्येने स्थानिक शाळांमधून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम. एससी. ही पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून न्यूजर्सी येथील प्रतिष्ठित औषध कंपनीत गेली 25 वर्षांहून अधिक काळ शास्त्रज्ञ म्हणून कार्य केले आहे.

# साताऱ्यात रक्तदान शिबिर व पथनाट्य

सातारा (दै. संध्या)

३४ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या अनुषंगाने वाहतूक नियंत्रण शाखा, सातारा शहर व अक्षय ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच सातारा शहरातील नागरिकांसाठी मंगळवार दि. २० रोजी वाहतूक शाखेच्या कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ११५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

या शिबिरात ३० वाहतूक पोलिसांनी रक्तदान केले. तसेच डॉग स्कॉडचे कर्मचारी, सातारा तालुका पोलिस, शहर पोलिस,जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखा, महामार्ग ट्रॅफिक पोलिस व ट्रॅफिक वॉर्डन यांनीही रक्तदान करून रस्ता सुरक्षेसोबतच मानवी जीवनरक्षणाचा संदेश दिला. या उपक्रमामुळे पोलिस दल व नागरिकांमधील आपुलकी अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.



## जेष्ठ नागरिक संघाच्यावतीने जेजुरीच्या लोकप्रतिनिधींचा सन्मान

**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीत निवडून आलेले नवनिर्वाचित नगराध्यक्ष,उपनगराध्यक्ष व नगरसेवकांचा जयमल्हार ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आले. जेजुरी जयमल्हार जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष श्यामकाका पेशवे यांच्या अध्यक्षतेखाली या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष जयदीप बारभाई उपाध्यक्ष गणेश निकुडे व नगरसेवकांचा श्यामकाका पेशवे श्रीमती उषा आगलावे, नानी आगलावे, जयश्री बेलसरे, सुनंदा बारभाई, सुरेखा बारभाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्वच उपक्रम आदर्श असून ज्येष्ठांच्या अनुभवाच्या शिदोरीचा जेजुरीच्या विकासासाठी फायदा होईल.श्यामकाका पेशवे यांचे कार्य कौतुकास्पद आहे असे सांगितले. श्यामकाका पेशवे यांनी यावेळी जेजुरी नगरपरिषदेत दरवर्षी जे लोकप्रतिनिधी उत्कृष्ठ काम करतील त्यांना संघटनेच्या वतीने आदर्श लोकप्रतिनिधी चां किताब दिला जाईल असे जाहीर केले यावेळी नगरसेविका मोनिका घाडगे,भक्ती कोरपड, प्रियंका देशमुख ,शिवाजी जगताप, अस्लम पानसरे यांनी मनोगते व्यक्त केली. सदर कार्यक्रमाचे नियोजन हरिश्चंद्र कोरपड , माणिक पवार, सुरेश पवार, बाबुराव जगताप, ना नंदकुमार निरगुडे, सुहास बारभाई, हरिचंद्र कराळे अनंत जगताप सचिव रोहिणी धोत्रे यांनी केले.

### पुणे जिल्ह्याने खेळाला दिले प्राधान्य

# स्पर्धेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद : अजित पवार

**'बजाज पुणे ग्रँड टूर' स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सुरुवात**

**पुणे (दै. संध्या)**

"भारत माता की जय", "जय भवानी जय शिवाजी", "गणपती बाप्पा मोरया" अशा घोषणांनी, शाळेच्या मुलांनी शिवकाळातील वेशभुषा केलेले शिवराज्याभिषेकाचे सादरीकरण आणि सासवडकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने भारलेल्या वातावरणात 'बजाज पुणे ग्रँड टूर' या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्याची सासवड नगर परिषद परिसरात सुरूवात झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झेंडी दाखवून या टप्प्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष सायकलपटूंशी संवाद साधून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्ष आनंदी जगताप, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सचिव संजय शेटे आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले,




पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्याने नेहमीच खेळांना प्राधान्य दिले आहे. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याशिवाय खेळाडूंनाही आनंद आणि प्रेरणा मिळत नाही. या स्पर्धेसाठी उत्कृष्ट नियोजन करण्यात आले असून स्पर्धेचे मार्ग अत्यंत दर्जेदार आहेत. रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून नागरिक ज्या पद्धतीने प्रोत्साहन देत आहेत, त्यामुळे सायकलपटूंना विशेष ऊर्जा मिळत असल्याची भावना खेळाडूंनी व्यक्त केल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. या स्पर्धेच्या आयोजनासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. केंद्र सरकार, राज्य शासन आणि संपूर्ण पुणे जिल्हा प्रशासन एकत्रितपणे काम करीत असून बजाज, सिरम इन्स्टिट्यूट यांसारख्या नामांकित कंपन्या तसेच विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी सक्रिय सहभाग नोंदवत आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. सासवडकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल उपमुख्यमंत्री पवार यांनी समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले.

'बजाज पुणे ग्रँड टूर' स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्याची एकूण लांबी १३७.७ किलोमीटर असून हा टप्पा सासवड येथून सुरू होऊन सुपे, पानवडी घाट, काळदरी (बोरी फाटा), मांढर, माहूर, परींचे, हरणी, वाल्हे, पिसुर्टी, नीरा, ब्राह्मणधरा, मुर्टी, मोरगाव, तरडोली, जळगाव क. प., कऱ्हावागज, खंडोबानगर, पिंपळी, लिमटेक, कन्हेरी, रुई रोड सावळ, वंजारवाडी मार्गे विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती येथे संपन्न झाला. मार्गावरील प्रत्येक गावात नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून टाळ्या, शिट्ट्या, घोषणाबाजी आणि विविध वाद्यांच्या निनादात सायकलपटूंना उत्साहाने प्रोत्साहन दिले. गावोगावी रस्ते सजविण्यात आले होते, चौकाचौकात 'पुणे ग्रँड टूर'चे कटआऊट्स लावण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण मार्गावर उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

**आजच्या स्पर्धेतील क्षणचित्रे**

- उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुनेत्रा पवार यांनी सायकलपटूंशी संवाद साधला. सायकलींची पाहणी करत खेळाडूंचा उत्साह वाढविला.
- रस्त्याच्या दुतर्फा सासवडकरांनी मोठी गर्दी केली होती. अनेकांच्या हातात भारतीय तिरंगा डौलाने फडकत होता.
- सायकलपटूंनी शर्यतीदरम्यान प्रेक्षकांच्या दिशेने हात उंचावत 'हाय-फाईव्ह' देत प्रतिसाद दिला, ज्यामुळे वातावरण अधिकच चैतन्यमय झाले.
- स्पर्धेचा शुभंकर (Mascot) लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचे आकर्षण ठरला.
- संपूर्ण परिसर 'पुणे ग्रँड टूर'च्या फलकांनी सजला होता. शिस्तबद्ध आयोजन व पोलिसांच्या चोख बंदोबस्तात तिसरा टप्पा यशस्वीपणे पार पडला.

## उधार सिगारेट न दिल्याने सांगवीत कोयत्याने मारहाण

**माळेगाव (दै. संध्या)**

**■ कोयत्याने केलेल्या जीवघेण्या हल्ल्यात चार जण गंभीर जखमी**

पानटपरी चालकाने उधार सिगारेट न दिल्याने त्यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून या भांडणाचा जाब विचारणाऱ्या पिता पुत्रांवर कोयत्याने हल्ला करण्याची घटना सांगवी ता.बारामती येथे (दि. १९) रोजी दुपारी साडेबारा वाजता घडली आहे.या घटनेत चौघे जण जखमी असून यामध्ये एक वयोवृद्ध महिला आहे. अभिषेक महादेव जगताप,महादेव विश्वनाथ जगताप,गिता महादेव जगताप,काजल महादेव जगताप (सर्व रा.सांगवी ता.बारामती) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींचे नाव असून त्यांच्या विरोधात प्रतिक सुनील जगताप (रा. सांगवी ता. बारामती) यांनी फिर्याद दिली आहे.फिर्यादीची सांगवी गावात पानटपरी असुन आरोपी अभिषेक जगताप यास उधार सिगारेट न दिल्याने त्याने शिविगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.हि माहिती फिर्यादीचा लहान भाऊ सार्थक जगताप यास माहित झाल्याने तो व फिर्यादी हे आरोपीच्या घरी त्याचे वडील महादेव जगताप यास सांगण्यासाठी गेले असता त्यांचे काही एक ऐकुन न घेता महादेव जगताप, त्याची पत्नी गिता जगताप व मुलगी काजल जगताप या तिघांनी शिविगाळ व दमदाटी करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.या भांडणाचा आवाज ऐकून फिर्यादीचे वडील सुनील जगताप हे भांडण सोडवण्यासाठी गेले होते.यावेळी अभिषेक जगताप याने घरातील कोयता घेऊन सुनील जगताप यांच्या डोक्यात पाठीमागून वार केला.यावेळी आपल्या वडिलांना वाचवताना सार्थक मधे गेल्यावर त्याचेवरही आरोपीने कोयत्याने डोक्यावर वार केला.तसेच दुसरा वार करत असताना बचाव करताना करंगळीला जखम झाली आहे.

## तांदुळवाडीत तरुणावर हल्ल्याप्रकरणी दोघांना अटक

**दोन मुख्य आरोपी अटकेत; इंस्टाग्रामला रील ठेवल्याचे वादातून मारहाण,परस्पर विरोधी गुन्हे दाखल**

**बारामती (दै. संध्या)**

तांदुळवाडी (ता. बारामती) येथे एका कार्यक्रमादरम्यान जेवण वाढत असताना काढलेले व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करण्याचे वादावरून १८ वर्षीय तरुणावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी बारामती तालुका पोलिसांनी तातडीची कारवाई करत दोन मुख्य आरोपींना अटक केली आहे.दि. १८ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता सार्थक लक्ष्मण अंबुरे (वय १८, रा. तांदुळवाडी) हा भैरवनाथ मंदिरात पालखीतील भाविकांसाठी जेवण वाढण्याचे काम करत होता.यावेळी गावातील एकाने त्याचा व्हिडिओ काढून सोशल मीडियावर पोस्ट केला. तो डिलीट करण्यावरून वाद झाला.नंतर पप्पू शितोळे याने त्याला काम असल्याचे सांगून मंदिराच्या मागील बाजूस नेले.तेथे आधीच गणेश सुभाष जाधव, अभिजीत शेळके,अरुण जाधव व अन्य इसम उपस्थित होते.



यानंतर सार्थकला शिवीगाळ करून जबरदस्तीने यश शितोळे यांच्या घराकडे नेण्यात आले. तेथे खाली पाडून गज आणि लाथा-बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.यावेळी गणेश जाधव याने गचुंडे धरून पिस्तूल काढत जीवे मारण्याची धमकी दिली, तर पप्पू शितोळे याने प्रकार कुणाला सांगितल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील,अशी धमकी दिल्याचा आरोप आहे.

मारहाणीत सार्थकच्या पाठीवर गंभीर दुखापत झाली आहे.जीवाच्या भीतीने त्याने तत्काळ तक्रार दिली नव्हती.मात्र, दुसऱ्या दिवशी दुखापतीचा त्रास वाढल्यानंतर त्याने आईसह बारामती तालुका पोलीस ठाण्यात धाव घेतली. गंभीर दुखापत केल्या बाबत गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत तालुका पोलिसांनी तात्काळ पोलीस पथक पाठवून मुख्य आरोपी गणेश सुभाष जाधव (वय ३४) व पप्पू शितोळे (वय ३४, दोघेही रा. तांदुळवाडी) यांना ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आलेली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास बारामती तालुका पोलीस करत आहेत.

दरम्यान एक अल्पवयीन मुलास सुद्धा डोक्यात कोयता लागला होता, त्याचे तक्रारीवरून आरोपी सार्थक अंभोरे आकाश आंबोरे बापू अंभोरे पोपट अंभोरे लखन अंभोरे सर्व राहणार तांदुळवाडी यांच्या विरुद्ध गंभीर दुखापत केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सेहगील अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील पोलीस अमलदार सुरेंद्र वाघ भारत खारतोडे जितेंद्र शिंदे मनोज पवार दादा दराडे आफ्रिन शेख यांनी केली आहे.

**थोडक्यात पण महत्वाचे...**




### पीपल बाबाजी यांच्या 60व्या वाढदिवसा निमित्त द ग्रीन लेगसी वीक उत्साहात

**■ भवरापूर येथे ६०० फळझाडांचे वाटप; महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संगम**

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : प्रख्यात पर्यावरणप्रेमी व वृक्षारोपण चळवळीचे प्रणेते पीपल बाबाजी यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त 'द ग्रीन लेगसी वीक' (The Green Legacy Week) हा उपक्रम सध्या उत्साहात साजरा केला जात आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने भवरापूर येथे पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरणाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. यावेळी तब्बल ६०० फळझाडांचे मोफत वाटप करण्यात आले. वाढत्या जागतिकीकरणाच्या काळात निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या पीपल बाबाजी यांनी आपल्या ६० व्या वर्षात पदार्पण करताना केक कापण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीतून 'ग्रीन लेगसी' जपण्याचा संदेश दिला आहे. या उपक्रमाअंतर्गत आंबा, पेरू, सीताफळ, चिंच, आवळा, पपई आणि जांभूळ यांसारख्या विविध फळझाडांची रोपे गावकऱ्यांना वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे गावातील महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला हळदी-कुंकू समारंभ. पारंपरिक सण साजरा करतानाच महिलांना वाण म्हणून फळझाडांची रोपे देण्यात आली. यामुळे प्रत्येक घरात एक झाड लागून भविष्यात भवरापूर गाव 'फळबागांचे गाव' म्हणून ओळख निर्माण करेल, असा विश्वास Give Me Trees Trust संस्थेचे अकाउंटंट रोहन भोंडवे यांनी व्यक्त केला.

### आळंदी नगरपरिषदेच्या स्थायी व विषय समित्यांच्या गठनासाठी आज विशेष सभा

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी नगरपरिषदेच्या स्थायी समिती व विविध विषय समित्यांची रचना तसेच विषय समित्यांच्या सभापतींची निवड करण्यासाठी आज विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा सकाळी अकरा वाजता आळंदी नगरपरिषद सभागृहात होणार आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ६४, ६५ व ६६ तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (विषय समित्यांच्या सभापती पदाची निवडणूक) नियम, २००६ अन्वये ही विशेष सभा बोलाविण्यात आली आहे. या सभेमध्ये स्थायी समिती व विषय समित्यांवरील सदस्यांचे नामनिर्देशन, तसेच विषय समित्यांच्या सभापतींची निवड करण्यात येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या ४ व २९ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार झालेल्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम–२०२५ अंतर्गत नवनिर्वाचित अध्यक्ष व नगरसेवकांची नावे २३ डिसेंबर २०२५ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अधिनियमातील तरतुदींनुसार स्थायी व विषय समित्यांची रचना करणे आवश्यक असल्याने ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विशेष सभेत विषय समित्यांची संख्या व सदस्यसंख्या निश्चित करण्यात येणार असून, उपाध्यक्ष कोणत्या विषय समितीचे पदसिद्ध सभापती असतील हे ठरविले जाणार आहे. तसेच उर्वरित विषय समित्यांच्या सभापतींची निवड केली जाणार असून, आवश्यक असल्यास निवडणूक प्रक्रिया राबवून निकाल जाहीर करण्यात येईल. त्यानंतर स्थायी समितीची रचना घोषित केली जाणार आहे. या विशेष सभेसाठी पुणे जिल्हाधिकारी यांनी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांची पिठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून, त्यांच्या अध्यक्षतेखाली अधिनियम व नियमांनुसार संपूर्ण कार्यवाही पार पडणार आहे.

## मीना म्हसे यांनी शाळेत तयार केले बालकवी : गजानन पाटील




जिल्हा पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षिका मीना म्हसे यांचा विद्यार्थ्यांच्या संदर्भात असलेला कवितांचा उपक्रम कौतुकास्पद आहे. तसेच शाळेमध्ये औषधी वनस्पतींची लागवड करून विद्यार्थ्यांकडून औषधी वनस्पतींची माहिती संपादित करून त्यांनी तयार केलेले पुस्तक विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबर त्यांनी राबवलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रमा संदर्भात त्यांचे अभिनंदन.

**- गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे**

**पुणे (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील उपक्रमशील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगतापवाडी( शिंदेवाडी) येथे पुणे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी भेट दिली असता विद्यार्थ्यांची गुणवत्ता व उपक्रमांविषयी माहिती घेतली. विद्यार्थ्यांचा स्वनिर्मित कवितांचा उपक्रम पाहून त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका मीना अशोक म्हसे यांचे त्यांनी कौतुक केले. यावेळी मीना म्हसे यांनी पाटील साहेबांना औषधी वनस्पतींचे उपयोग आणि महत्त्व हे त्यांनी विद्यार्थ्यांचे संपादित केलेली पुस्तक भेट म्हणून दिले. यावेळी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी शिंदेवाडी गावचे सरपंच संदीपनाना जगताप, कानिफनाथ सोसायटीचे चेअरमन नवनाथ जगताप, शिंदेवाडीचे माजी उपसरपंच मोहन शिंदे, केंद्रप्रमुख आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष जगताप, माजी अध्यक्ष अभिजीत जगताप, माजी उपसरपंच मोहन शिंदे, रमेश देवकर, चेअरमन नवनाथ जगताप, सागर देवकर, अक्षय जगताप, आप्पासाहेब जगताप, राजेंद्र भोसले, माजी अध्यक्ष राहुल जगताप, सत्यवान जगताप, अनिल जगताप,सागर जगताप, गणेश मेमाणे, शरद जगताप, घनश्याम जगताप,नितीन शिंदे, दीपक शिंदे ,सिद्धार्थ शिंदे, रमेश देवकर सत्यवान जगताप, शरद जगताप, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका मधुबाला वेताळ यांनी केले, उपक्रमशील शिक्षिका व औषधी वनस्पती पुस्तकाच्या संपादिका मीना म्हसे यांनी स्वागत तर उपशिक्षक काशिनाथ डफळ यांनी आभार मानले.

## डोळ्यांच्या संसर्गाचे रुग्ण वाढले

**रावेत (दै. संध्या)**

रावेत आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून डोळे येणे (कंजक्टिवाइटिस) या आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहेत. खासगी तसेच सरकारी दवाखान्यांमध्ये दररोज मोठ्या संख्येने नागरिक उपचारासाठी येत असून, ही साथ स्वरूप धारण करत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. स्थानिक नेत्रतज्ज्ञांच्या मते, हवामानातील बदल, धूळ, प्रदूषण तसेच संसर्गजन्य विषाणू किंवा जिवाणूंमुळे हा आजार वेगाने पसरतो आहे. डोळे लाल होणे, खाज सुटणे, पाणी येणे, जळजळ होणे, सूज येणे, चिकट स्राव होणे आणि प्रकाशाकडे पाहताना त्रास होणे, अशी लक्षणे अनेक रुग्णांमध्ये दिसून येत आहेत. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या व्यक्तींमध्ये या आजाराचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. एका खासगी रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले की, 'गेल्या आठवड्यात आमच्याकडे येणाऱ्या डोळे येण्याच्या रुग्णांची संख्या दुपटीने वाढली आहे. वेळेवर उपचार न घेतल्यास त्रास वाढू शकतो.'

**"परिसरात रुग्णसंख्या वाढत आहे. वातावरणातील बदलाचा हा परिणाम असू शकतो. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सूचना देण्यात येत आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याबरोबरच गर्दीच्या ठिकाणी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.**

**- डॉ. बाळासाहेब होडघर, वरिष्ठ आरोग्य अधिकारी, कुटे हॉस्पिटल, आकुर्डी**

# सिंहगड कॉलेज, लोणावळा येथील कर्मचारी १९ जानेवारीपासून बेमुदत संपावर

**१४ महिने वेतन थकीत, २०२५ पर्यंत पीएफ बाकी; अनंत बँकेतील ठेवी न मिळाल्याने कामगार आक्रमक**

**लोणावळा (दै. संध्या)**

सिंहगड कॉलेज, लोणावळा येथील कर्मचारी व कामगार गेल्या दीर्घकाळापासून गंभीर आर्थिक संकटात सापडले असून, त्यांच्या न्याय्य व कायदेशीर मागण्यांकडे कॉलेज व्यवस्थापनाकडून सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी १९ जानेवारीपासून सर्व कर्मचारी व कामगारांनी बेमुदत संप पुकारला आहे, अशी माहिती भारतीय मजदूर संघाचे चिटणीस बाळासाहेब भुजबळ यांनी दिली.

कॉलेजमधील अनेक कर्मचारी व कामगारांचे सलग १४ महिन्यांचे वेतन अद्याप अदा करण्यात आलेले नाही. त्यामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून, मुलांचे शिक्षण, आरोग्यसेवा आणि दैनंदिन खर्च भागविणे अशक्य झाले आहे. याशिवाय, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) रक्कम सन २०२५ पर्यंत थकीत असून, ही गंभीर कायदेशीर बाब असतानाही व्यवस्थापनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.

या संदर्भात सहायक कामगार आयुक्त श्री. गजानन शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली होती; मात्र या बैठकीला व्यवस्थापनाचा एकही प्रतिनिधी उपस्थित राहिला नाही. त्यानंतर लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक श्री. तायडे यांच्यासोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीस व्यवस्थापनाकडून संचालक गायकवाड उपस्थित होते.

बैठकीदरम्यान सिंहगड टेक्निकलचे चेअरमन एम. एन. नवले यांच्यासोबत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र त्यावर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

